पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक
# सिटी न्यूज सुपरफास्ट
अकोला
● वर्ष १६ ● अंक ३५ ● सोमवार, दि. १० ऑगस्ट २०२६ ● मूल्य ५ ● पृष्ठे ८
RNI No.- MAHMAR/2012/49642 Postal Regn. No. AKL DN/283/2024-26 Web. https://epaper.citynewssuperfast.com

**सुविचार**

कारण सांगणारी लोकं यशस्वी होत नाहीत आणि, यशस्वी होणारे लोक कारण सांगत नाहीत

सिटी न्यूज सुपरफास्ट
अकोट शहरात
अंक मिळण्यासाठी व जाहिरातींसाठी
संपर्क
राजेश सोळंके
विशेष प्रतिनिधी
+91 8888299934

# कोट्यवधींचा भ्रष्टाचार अन् अधिकाऱ्यांची मनमानी!

## कृषी विद्यापीठात चाललंय काय ?; राज्य सरकारने विशेष ऑडिट करण्याची गरज व्यक्त

प्रतिनिधी १० ऑगस्ट

**अकोला:** डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ सध्या विविध कारभारांमुळे अन् भ्रष्टाचाराच्या गंभीर आरोपांमुळे ढवळून निघाले आहे. कोट्यवधी रुपयांची भाडेमाफी, नियमबाह्य जागावाटप, बनावट बिले काढून केलेली आर्थिक उधळपट्टी आणि अधिकाऱ्यांचे अंतर्गत वाद यांमुळे विद्यापीठाच्या प्रतिमेला मोठा धक्का बसला आहे.

या संपूर्ण प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन राज्य सरकारने विद्यापीठात विशेष ऑडीट पथक पाठवून चौकशी करण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे.

विद्यापीठात सेवाज्येष्ठता आणि नियमांना पायदळी तुडवून वरिष्ठांना डावलत कनिष्ठ अधिकाऱ्यांना चार्ज देण्याचा उद्योग कोणी केला आणि त्याला जबाबदार कोण. असे विविध प्रश्न विचारले जात आहे. कनिष्ठांनी तर विद्यापीठात घोटाळा केला नाही ना अशी चर्चा रंगली आहे.

एका वरिष्ठ अधिकाऱ्याच्या बंगल्याच्या नूतनीकरण आणि देखभालीवर झालेली उधळपट्टी नक्की कोणाच्या आदेशाने झाली.

या सर्व घोटाळ्यांवर अद्याप ठोस कारवाई झालेली नाही. त्यामुळे राज्य सरकारने या संपूर्ण प्रकरणाची दखल घेऊन उच्चस्तरीय चौकशी समिती आणि विशेष ऑडिट पथक नेमावे, अशी तीव्र मागणी विद्यापीठ वर्तुळातून व शेतकरी संघटनांकडून होत आहे.



### बनावट बिलांद्वारे लाखो रुपयांचा घोटाळा

विद्यापीठातील लाखो रुपयांच्या भ्रष्टाचार प्रकरणात आता 'टिचिंग' आणि 'नॉन-टिचिंग' कर्मचाऱ्यांमधील वाद चव्हाट्यावर आला आहे. संशोधन संचालक डॉ. श्यामसुंदर माने यांनी कोरोना काळात काढलेल्या कामांची देयके पुन्हा (डुप्लिकेट/कलर झेरॉक्स बिलांवर) मंजूर करून आर्थिक गैरव्यवहार केल्याचा गंभीर आरोप आहे. या संपूर्ण घोळात तत्कालीन सहाय्यक कुलसचिव तथा आहरण व वितरण अधिकारी एच. एफ. राठोड आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी त्यांना मोलाची मदत केल्याची माहिती समोर येत आहे. विशेष म्हणजे, राठोड यांनी कंत्राटदारांच्या नावाचे चेक न काढता थेट सहाय्यक कुलसचिव तथा आहरण व वितरण अधिकारी यांच्या नावानेच लाखो रुपयांचे चेक काढून पैसे स्वतःच्या खात्यावर वळते केल्याचे उघडकीस आले आहे. ड्रायव्हिंग ऑफिसर बिल रिसिप्टमध्ये बिल नंबर कसा रिपीट झाला आणि मंथली एक्स्पेन्डिचर सिस्टीममध्ये कंट्रोलरच्या (वित्त नियंत्रक) हे कसे लक्षात आले नाही, असा संतप्त सवाल विचारला जात आहे. राठोड यांच्या दूमजली बंगल्यात तर हे पैसे गुंतले नाही ना अशी विचारणा होत आहे.

### गुन्हा दाखल करण्यास टाळाटाळ का?

या आर्थिक गैरव्यवहाराचे सर्व पुरावे उपलब्ध असूनही अकोला येथील एमआयडीसी पोलीस गुन्हा दाखल करण्यास टाळाटाळ करत असल्याचे चित्र आहे. डॉ. श्यामसुंदर माने यांच्यावर गुन्हा दाखल झाल्यास त्यांचे संशोधन संचालकपद धोक्यात येईलच, शिवाय ते कुलगुरू पदाच्या शर्यतीतून बाहेर पडतील; त्यामुळेच पोलीस तक्रार दाखल करून घेण्यास विलंब करत असल्याचे विश्वसनीय सूत्रांकडून समजते. दुसरीकडे, ज्यांनी बिले मंजूर केली, ज्यांनी कामे प्रस्तावित केली आणि ज्यांनी वर्क ऑर्डर दिल्या ते वरिष्ठ अधिकारी मोकळे फिरत असून, केवळ नॉन-टिचिंग स्टाफला चौकशीच्या नावाने वेठीस धरले जात असल्याचा आरोप कर्मचाऱ्यांमधून होत आहे.

### ग्रंथालयातील अनागोंदी कारभार

आशिया खंडातील दुसऱ्या क्रमांकाचे भव्य ग्रंथालय म्हणून ओळख असलेल्या पंदेकृविच्या ग्रंथालयात कायमस्वरूपी ग्रंथपालच नाही. या अत्यंत महत्त्वाच्या पदाचा कारभार एका कृषी अर्थतज्ज्ञाकडे सोपवण्यात आला आहे. ग्रंथालयातील कायमस्वरूपी नोकरभरती का टाळली जात आहे ? कर्मचाऱ्यांना कंत्राटी पद्धतीवर ठेवून किती दिवस कामकाज चालवणार विद्यापीठात कुठलेही रोस्टर न पाळता नियुक्त्या दिल्या जात आहेत.

### कोट्यवधींची खैरात आणि भाडेमाफी

विद्यापीठातील भ्रष्टाचाराची व्याप्ती केवळ बिलांपुरती मर्यादित नसून, मालमत्तेच्या व्यवहारातही मोठे गैरव्यवहार झाल्याचा संशय आहे. नागपूर येथील बोटॅनिकल गार्डनच्या कोट्यवधी रुपयांच्या भाडेमाफीचा ठराव कोणी आणि कोणाच्या फायद्यासाठी घेतला, याची चौकशी होण्याची गरज आहे. कुणाच्या मामासाठी हा भाडेमाफीचा कोट्यावधीचा ठराव घेतला गेला. अमरावती येथील विद्यापीठाच्या कोट्यवधीची जमीन कृषी विभागाला खैरातीसारखी वाटप करण्यामागे कोण असा प्रश्न अनुत्तरीत आहे. विद्यापीठाच्या सोयाबीन संशोधन च्या जागेवर कोणाचा डोळा आहे याचा ही शोध लागण्याची गरज आहे.

## »थोडक्यात

### मराठा आरक्षणाच्या सुनावणीला फटका!

**मुंबई :** महाराष्ट्राच्या राजकारणासोबतच राज्यातील लाखो मराठा समाजाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या मराठा आरक्षणाच्या प्रकरणाबाबत मोठी घडामोड समोर आली आहे. मुंबई उच्च न्यायालयाचे प्रभारी मुख्य न्यायमूर्ती रवींद्र व्ही. घुगे यांची कोलकाता उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तीपदासाठी नियुक्ती करण्याची शिफारस सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायवृंदाने केंद्र सरकारकडे केली आहे. न्यायमूर्ती घुगे यांची कोलकाता उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तीपदी नियुक्ती झाल्यास त्याचा सध्या सुरू असलेल्या मराठा आरक्षणाच्या सुनावणीच्या गतीवर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### ईडीचे प्रमुख राहुल नवीन यांचा कार्यकाळ वाढवला!

नवी दिल्ली : केंद्र सरकारनं ईडीचे संचालक राहुल नवीन यांचा कार्यकाळ एका वर्षानं वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. राहुल नवीन यांच्या सेवानिवृत्तीची तारीख ३१ जुलै २०२७ आहे. मात्र, केंद्र सरकारनं राहुल नवीन यांना एका वर्षाची मुदतवाढ दिली आहे. आता राहुल नवीन १३ ऑगस्ट २०२७ पर्यंत ईडीचे संचालक म्हणून कार्यरत राहतील. राहुल नवीन यांचा ईडीतील दोन वर्षांचा कार्यकाळ या महिन्यात संपणार होता, मात्र त्यांना एका वर्षाची मुदतवाढ देण्यात आली आहे. केंद्रीय कार्मिक, लोक तक्रार आणि पेन्शन मंत्रालयाकडून यासंदर्भातील आदेश जारी केला.

### खोदकामावर गडकरींचा अल्टिमेटम!

नागपूर : अमृत योजनेसह विविध प्रकल्पांच्या नावाखाली रस्ते खोदून ते पूर्ववत न करणाऱ्या यंत्रणांना आता केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी थेट इशारा दिला आहे. नागनदी प्रकल्पाच्या कामात रस्ते खोदल्यानंतर ते पूर्ववत न करणाऱ्या अधिकाऱ्याचे निलंबन करा आणि संबंधित कंत्राटदाराला ब्लॅकलिस्ट करा, असे स्पष्ट आदेश गडकरी यांनी रविवारी प्रशासनाला दिले. त्यामुळे नागनदी प्रकल्पाच्या कामात रस्ते खोदणाऱ्या यंत्रणांची जबाबदारी निश्चित होणार आहे.

# आश्रम शाळेतील तीन विद्यार्थिनींचा सर्पदंशाने मृत्यू!

प्रतिनिधी १० ऑगस्ट

गडचिरोली : गडचिरोलीच्या धानोरा तालुक्यातील जपतलाई निवासी आश्रम शाळेत सर्पदंशाने तीन विद्यार्थिनींचा मृत्यू, तर तीन विद्यार्थिनी जखमी असल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. दीपिका लकडा, सुष्मिता मंडल आणि अनु कोरेटी असे मृत्यू झालेल्या तीन विद्यार्थिनींची नावे आहेत. विद्यार्थिनी जेवणानंतर झोपलेले असताना रात्री दोन ते अडीच वाजताच्या सुमारास विद्यार्थिनींना सर्पदंश झाल्याची घटना समोर आली. या घटनेनंतर विद्यार्थिनींना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले.मात्र,धानोरा रुग्णालयात उपचारादरम्यान इयत्ता सहावीतील दीपिका लकडा आणि इयत्ता आठवीतील सुष्मिता मंडल या दोन विद्यार्थिनींचा मृत्यू झाला. तर गडचिरोलीच्या जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू असताना इयत्ता दुसरीतील अनु कोरेटी हिचाही मृत्यू झाला. दरम्यान, इयत्ता पाचवीतील दीपिका मदवी, सहावीतील कविता किरंगा आणि इयत्ता आठवीतील समृद्धी नैताम या तीन विद्यार्थिनींवर गडचिरोली जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

# जे दिल्लीत घडलं तेच झारखंडमध्ये घडतेय!

## हजारो विद्यार्थ्यांची विधानसभेकडे कूच, पाण्याचा मारा; पोलिसांचा बंदोबस्त

प्रतिनिधी १० ऑगस्ट

रांची : झारखंडमध्ये भरती परीक्षेत झालेल्या कथित घोटाळ्यावरून विद्यार्थ्यांचं आंदोलन सुरूच आहे. रांचीमध्ये हजारो विद्यार्थी एकवटले असून जोरदार आंदोलन करत आहेत. या विद्यार्थ्यांनी विधानसभेच्या दिशेने कूच केली आहे. दिल्लीच्या जंतरमंतरवर ज्या पद्धतीने विद्यार्थ्यांचं आंदोलन पेटलं होतं, तसंच आंदोलन रांचीमध्ये होताना दिसत आहे. सीजीएल परीक्षा रद्द करा आणि संबंधित प्रकरणाची सीबीआय चौकशी करा, तोपर्यंत आंदोलन मागे घेणार नाही, अशी आक्रमक भूमिका विद्यार्थ्यांनी घेतली आहे. हजारो विद्यार्थ्यांनी आंदोलन सुरू केल्याने पोलीस हाय अलर्टवर आहेत. ठिकठिकाणी पोलिसांचा मोठा बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. विद्यार्थ्यांना विधानसभेकडे येण्यापासून रोखण्यासाठी बॅरिकेड्सचा वापर केला जात आहे. जुनी विधानसभा आणि नव्या विधानसभेच्या मार्गात एकूण ६ बॅरिकेड्स लावण्यात आल्या



आहेत. विद्यार्थ्यांनी या बॅरिकेडिंग पार केल्या आहेत. विद्यार्थी पुढे पुढे सरकत असल्याने पोलिसांनी पाण्याचा मारा करून त्यांना पांगवण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. त्यांना समजावत आहेत. विद्यार्थ्यांनी शांततेत आंदोलन केलं तर त्यांना कोणताच त्रास होणार नाही. विद्यार्थ्यांना आमच्याकडून कोणताही त्रास होणार नाही, याची आम्ही खबरदारी घेणार असल्याचंही पोलिसांनी सांगितलं. देवेंद्र नाथ मेहतो हे रुग्णवाहिकेतून विधानसभेच्या दिशेने रवाना झाले आहेत. इतर विद्यार्थ्यांसोबत ते मार्चमध्ये सहभागी होणार आहेत.

### आंदोलक विधानसभेला घेराव घालणार!

रविवारी राज्य मंत्र्यांची एक विशेष समिती आणि विद्यार्थ्यांच्या प्रतिनिधीमध्ये तब्बल पाच तास चर्चा झाली. पण या चर्चेतून कोणताच तोडगा निघाला नाही. त्यामुळे आंदोलकांनी विधानसभेला घेराव घालण्याचा निर्णय घेतला. त्यानुसारच विद्यार्थी आता विधानसभेच्या दिशेने जात आहेत. विद्यार्थ्यांनी विधानसभेच्या दिशेने येऊ नये म्हणून रांची जिल्हा प्रशासनाने मोठा बंदोबस्त ठेवला आहे. तसेच विधानसभा परिसरात कलम १६३ लागू केलं आहे.

# शरद पवारांचे खासदार अन् पीएम मोदींची 15 मिनिटे चर्चा!

वृत्तसंस्था १० ऑगस्ट

**नवी दिल्ली :** महाराष्ट्राच्या राजकारणात राजकीय घडामोडींना वेग आला आहे. काही दिवसांपूर्वी बांकीपूर विधानसभा पोटनिवडणूक जिंकल्यानंतर प्रशांत किशोर आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यात दोन भेटी झाल्या होत्या. आता सोमवारी शरद पवारांचे ८ खासदार आणि पंतप्रधान नरेंद्र मोदींची भेट झाली असून त्यांच्यात १५ मिनिटांच्यावर चर्चा झाली. रद पवारांच्या ८



खासदारांनी संसद भवनातील पंतप्रधान कार्यालयात पीएम नरेंद्र मोदींची भेट घेतली. भेटीनंतर झालेल्या बैठकीत महत्त्वाच्या विषयांवर चर्चा झाली. सर्व खासदार भेटीसाठी पोहोचल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदींनी सुप्रिया सुळे यांच्याकडे शरद पवार यांच्या प्रकृतीची विचारणा केली. त्यानंतर शरद पवार यांच्या एनर्जीचा सर्वांनी आदर्श घेतला पाहिजे,अशा शब्दात मोदींनी कौतुक केलं.त्यानंतर सर्व खासदारांनी पंतप्रधान मोदींकडे मतदारसंघातील प्रश्न मांडले. त्यामध्ये बीडचा पाणी प्रश्न, नवी मुंबईच्या विमानतळाचे नामकरण, कर्करोगाविषयीचा मुद्दा, नाशिक-पुणे हायस्पीड रेल्वे प्रकल्पाचा मुद्दा मांडला. यावरच या बैठकीत चर्चा झाल्याची माहिती आहे.

# फी थकीत असल्याने विद्यार्थिनीचे हॉलतिकीट रोखले

## महात्मा फुले नर्सिंग स्कूलचा मनमानी कारभार उघड

प्रतिनिधी १० ऑगस्ट

**अकोला:** महात्मा फुले नर्सिंग स्कूलमध्ये प्रशासकीय मनमानी आणि संवेदनशीलतेचा अभाव दाखवणारा अत्यंत गंभीर प्रकार समोर आला आहे. नर्सिंग अभ्यासक्रमात शिकणाऱ्या एका गरजू विद्यार्थिनीची फी थकीत असल्याचे शुल्लक कारण पुढे करत, ऐन परीक्षेच्या दिवशी तिचे परीक्षा प्रवेशपत्र (हॉलतिकीट) रोखण्यात आले. मात्र, माध्यम प्रतिनिधी (पत्रकार) महाविद्यालयात पोहोचून प्रशासनाला जाब विचारताच चक्रे वेगाने फिरली आणि संबंधित विद्यार्थिनीला तातडीने प्रवेशपत्र देण्यात आले. प्राप्त माहितीनुसार, आज सकाळी १० वाजता संबंधित विद्यार्थिनीची परीक्षा होती.

परीक्षा तोंडावर आलेली असतानाही महाविद्यालयाने प्रवेशपत्र देण्यास साफ नकार दिला. या विद्यार्थिनीचे छत्र हरपलेले असून, आईची प्रकृती सातत्याने अस्वास्थ असते. घरची अत्यंत बिकट आर्थिक परिस्थिती असतानाही ती जिद्दीने नर्सिंगचे शिक्षण घेत आहे. फी भरण्यासाठी तिने प्रशासनाकडे एका महिन्याची मुदत मागितली होती आणि त्याबाबतचे लेखी आश्वासनही दिले होते.

महाविद्यालय प्रशासनाच्या दाव्यानुसार विद्यार्थिनीच्या बँक खात्यात शिष्यवृत्ती जमा झाली आहे; परंतु आपल्याला शिष्यवृत्तीबाबत कोणताही मेसेज किंवा माहिती मिळालेली नाही, असा स्पष्ट खुलासा विद्यार्थिनीने केला.

तांत्रिक पडताळणी न करता आणि लेखी अभिवचन दिलेले असतानाही प्रशासनाने विद्यार्थिनीला ऐनवेळी मानसिक त्रासात ढकलले. सकाळी परीक्षा सुरू होण्याच्या काही वेळ आधी हा प्रकार पत्रकारांच्या निदर्शनास आला. माध्यम प्रतिनिधींनी तात्काळ महाविद्यालयात धाव घेत प्रशासकीय अधिकाऱ्यांना नियमांवरून व नैतिकतेवरून धारेवर धरले.

माध्यम प्रतिनिधींचा आक्रमक पवित्रा पाहून अखेर कॉलेज प्रशासनाने नमती भूमिका घेतली आणि संबंधित विद्यार्थिनीच्या हाती हॉलतिकीट सोपवले. त्यामुळे तिची परीक्षा बुडता बुडता वाचली.

# 'एआय'ने बनवला चक्क नवा व्हायरस!

## ऐतिहासिक संशोधन : भविष्यातील धोक्याने जग चिंताक्रांत

वृत्तसंस्था १० ऑगस्ट

**वॉशिंग्टन :** आर्टिफिशियल इंटेलिजन्स अर्थात एआय आता केवळ माहिती तंत्रज्ञान आणि कोडिंगपुरते मर्यादित राहिलेले नाही, तर त्याने थेट जीवशास्त्राच्या क्षेत्रात प्रवेश केला आहे. अमेरिकेतील जगप्रसिद्ध स्टॅनफोर्ड युनिव्हर्सिटी आणि आर्क इन्स्टिट्यूटच्या संशोधकांनी एआयच्या मदतीने निसर्गात अस्तित्वात नसलेले पूर्णपणे नवीन व्हायरस तयार केले आहेत. या ऐतिहासिक संशोधनामुळे वैद्यकीय क्षेत्रात उपचारांच्या नव्या आशा निर्माण झाल्या असल्या, तरी भविष्यातील सुरक्षेबाबत जगाची चिंता वाढली आहे.





संशोधकांनी स्पष्ट केले आहे की, एआयने डिझाइन केलेले हे व्हायरस मानवी शरीराला संक्रमित करणारे नाहीत. हे प्रामुख्याने 'बॅक्टेरियोफेज' आहेत. म्हणजेच केवळ बॅक्टेरियांना संक्रमित करून नष्ट करणारे विषाणू. प्रयोगशाळेतील चाचण्यांमध्ये या एआय-डिझाइन केलेल्या जीनोम असलेल्या व्हायरसने औषध-प्रतिरोधक असलेल्या ई. कोली सारख्या प्राणघातक बॅक्टेरियांनाही यशस्वीरीत्या नष्ट केले. त्यामुळे भविष्यात औषधांना दाद न देणाऱ्या 'सुपरबग' आणि संसर्गांवर प्रभावी उपचार करण्यासाठी या तंत्रज्ञानाचा मोठा उपयोग होऊ शकतो. एआयची ही अभूतपूर्व झेप एकाच वेळी मानवी वैद्यकीय उपचारांसाठी मोठा आशेचा किरण ठरू शकते, तर दुसरीकडे संपूर्ण जगाच्या जैवसुरक्षेसाठी एक मोठा इशारा ठरू शकते.

### वैद्यकीय क्षेत्रासाठी क्रांतिकारी पाऊल

सध्या जगभरात अँटिबायोटिक रेझिस्टन्सची मोठी समस्या निर्माण झाली आहे. अनेक सामान्य औषधे आता बॅक्टेरियांवर परिणाम करत नाहीत. अशा वेळी एआयच्या माध्यमातून विशिष्ट बॅक्टेरियांना शोधून मारणारे कृत्रिम व्हायरस तयार करणे हे वैद्यकीय शास्त्रातील एक क्रांतिकारी पाऊल मानले जात आहे.

### बायोसेफ्टी आणि सुरक्षेबाबत जगभरात चिंता

एकीकडे या यशामुळे आनंद व्यक्त होत असताना, दुसरीकडे जैवसुरक्षा तज्ज्ञांनी यावर गंभीर चिंता व्यक्त केली आहे. एआयच्या साहाय्याने संपूर्ण व्हायरल जीनोम डिझाइन करण्याची क्षमता आता प्रत्यक्षात आली आहे. भविष्यात या तंत्रज्ञानाचा गैरवापर करून मानवी आरोग्यासाठी अत्यंत घातक ठरणारे जैविक घटक किंवा जैविक शस्त्रे तयार केली जाऊ शकतात का? असा प्रश्न बायोसेफ्टी तज्ज्ञांकडून उपस्थित केला जात आहे.

# समृद्धी महामार्गावर एका पेट्रोल पंपावर ट्रक पार्किंगच्या नावावर लूट,पैसे दिले तरच सूट !

## अवैध पार्किंगच्या वसुलीला आशीर्वाद कुणाचा ?

प्रतिनिधी १० ऑगस्ट

**वाशिम :** समृद्धी महामार्गावरील जऊळका पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका पेट्रोल पंपावर अवैधरित्या ट्रक पार्किंग सुरू असून वाहन पार्किंग करण्यासाठी 100 ते 150 रुपये वसुल केला जात असल्याचा प्रकार समोर आला आहे.पैसे देऊनही उभ्या ट्रक मधून चोरीच्या घटना घडत असल्याच आरोप ट्रक चालकांनी केला आहे. त्यामुळे ही अवैध पार्किंग कोणाची आणि वसुली करणारे कोण याची चौकशी संबंधित दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली जात आहे. वाशिम जिल्ह्यातून जाणाऱ्या समृद्धी महामार्गावर मालेगाव तालुक्यातील डव्हा गावानजीक एका एच पी पेट्रोल पंपवर ट्रक चालकांकडून पार्किंगच्या



नावावर अवैध वसुली करण्यात येत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या पेट्रोलपंपवर शेकडो ट्रक रात्रभर उभे केले जातात आणि ट्रक थांबण्याकरिता प्रत्येक ट्रक चालकाकडून पार्किंगच्या नावाखाली 100 रुपये ते 150 रुपये प्रमाणे अवैध जबरी वसुली केल्या जात आहे.याच ठिकाणी रात्रीच्या दरम्यान उभे असलेल्या ट्रक मधून चोरीच्या घटना घडत असल्याचा आरोप देखील ट्रक चालकाकडून करण्यात आला आहे. हे पट्रोलपंप जऊळका पोलीस ठाण्याच्या हद्दीत येत असून या सुरू असलेल्या अवैध पार्किंगकडे पोलीस प्रशासन अर्थपूर्ण दुर्लक्ष करत असल्याची चर्चा आहे .पार्किंग शुल्क दिल्यावर कोणतीही पावती दिले जात नसून पावतीची मागणी केल्यास गुंड प्रवृत्तीच्या वसुली करणाऱ्याकडून दमदाटी केली जात आहे.वसुली फंटरच्या दादागिरीला ट्रक चालक त्रस्त झाले असून वारंवार होणाऱ्या या लुटला आळा घालण्याची मागणी होत आहे.त्यामुळे आता तरी याकडे लक्ष देवून या पार्कींगची चौकशी तातडीने करण्यात यावी तसेच ही अवैध वसुली कोणाच्या आशीर्वादाने सुरू आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट विविधा

सोमवार, दि. १० ऑगस्ट २०२६ Web. http://epaper.citynewssuperfast.com



## वृक्षवल्ली आम्हा सोयरे

“वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरी ।” ही जगद्गुरू संत तुकाराम महाराजांची अत्यंत प्रसिद्ध आणि सुंदर अभंगरचना आहे.

या ओळीचा शब्दशः आणि भावार्थ असा: वृक्षवल्ली: झाडे, झाडोरा आणि वेली आम्हा सोयरे: आमचे सोयरे (नातेवाईक/सगे-संबंधी) आहेत. **वनचरी :** वनात राहणारे पक्षी आणि प्राणी संत तुकाराम महाराज म्हणतात की, निसर्गातील झाडे, वेली, पक्षी आणि प्राणी हेच आमचे खरे सगे-सोयरे व नातेवाईक आहेत. ते मानवी समाजातील माया, मोह, प्रपंच आणि विकारांपासून दूर जाऊन निसर्गाच्या सानिध्यात ईश्वराचा ध्यास घेतात. निसर्गाशी एकरूप होऊन मिळणाऱ्या आत्मशांतीचे आणि पर्यावरणाशी जोडलेल्या अतूट नात्याचे वर्णन या अभंगात केले आहे. हा अभंग केवळ अध्यात्मिक दृष्टिकोनातूनच नव्हे, तर पर्यावरण संवर्धन आणि निसर्गप्रेमाचा एक महान संदेश देणारा मानला जातो.

# दुसऱ्या महायुद्धात एका बटालियनचे नेतृत्व करणारे : एस.पी.पी. थोरात!

लेफ्टनंट जनरल शंकरराव पांडुरंग पाटील थोरात (एस.पी.पी. थोरात), कीर्ती चक्र, डीएओ यांचा जन्म १२ ऑगस्ट १९०६ रोजी तर मृत्यू १० ऑगस्ट १९९२ मध्ये झाला. ते भारतीय सैन्यातील एक ज्येष्ठ जनरल ऑफिसर होते. त्यांनी १९६२ च्या भारत-चीन युद्धाच्या पूर्वतयारीच्या काळात जनरल ऑफिसर कमांडिंग-इन-चीफ इस्टर्न कमांड म्हणून शेवटची सेवा बजावली. त्यापूर्वी त्यांनी कोरिया युद्धाच्या समाप्तीनंतर ‘कस्टोडियन फोर्स ऑफ इंडिया’चे कमांडर म्हणून काम केले होते. दुसऱ्या महायुद्धादरम्यान एका बटालियनचे नेतृत्व केल्याबद्दल त्यांना डिस्टिंग्विश्ड सर्व्हिस ऑर्डरने सन्मानित करण्यात आले होते.

शंकरराव थोरात यांचा जन्म १२ ऑगस्ट १९०६ रोजी कोल्हापूर संस्थान, ब्रिटीश भारत येथील वडगाव या गावी झाला. त्यांनी सर परशुरामभाऊ महाविद्यालय, पुणे आणि त्यानंतर रॉयल मिलिटरी कॉलेज, सँडहर्स्ट येथे शिक्षण घेतले, जिथून ते ब्रिटीश भारतीय सैन्यात किंग्ज कमिशन्ड इंडियन ऑफिसर म्हणून नियुक्त झाले.

सँडहर्स्टमधून पदवी प्राप्त केल्यानंतर, सप्टेंबर १९२६ मध्ये थोरात यांची भारतीय सैन्याच्या ‘अनअटॅच्ड’ सूचीत नियुक्ती झाली. केसीआयओ अधिकाऱ्यांना भारतीय युनिटमध्ये पाठवण्यापूर्वी ब्रिटीश रेजिमेंटमध्ये सेवा बजावणे आवश्यक असे. थोरात यांची नियुक्ती अहमदनगर येथे तैनात असलेल्या द मिडलसेक्स रेजिमेंटच्या दुसऱ्या बटालियनमध्ये करण्यात आली. एक वर्षाच्या या नियुक्तीनंतर, ऑक्टोबर १९२७ मध्ये, त्यांची नियुक्ती ३० ऑगस्ट १९२६ पासूनच्या ज्येष्ठतेसह सेकंड लेफ्टनंट पदावर १४ वी पंजाब रेजिमेंट (१९ वी पंजाबी) च्या पहिल्या बटालियनमध्ये करण्यात आली. ती बटालियन वायव्य सरहद्द प्रांत मधील मनझई येथे होती. १९२८ च्या सुरुवातीला ही बटालियन औरंगाबादला हलवण्यात आली आणि नोव्हेंबर १९२८ मध्ये थोरात यांना लेफ्टनंट पदावर बढती देण्यात आली. ऑक्टोबर १९३१ मध्ये थोरात यांची दिल्ली येथे १४ व्या पंजाब रेजिमेंटच्या टेरिटोरियल बटालियनचे अॅडज्युटंट म्हणून नियुक्ती झाली. सुमारे तीन वर्षांनंतर ते आपल्या मूळ बटालियनमध्ये परतले आणि १९३५ मध्ये त्यांची युनिटचे क्वार्टरमास्टर म्हणून नियुक्ती झाली. त्यानंतर लवकरच, १९३५ च्या मोहमांड मोहिमेत सहभागी होण्यासाठी ही बटालियन पेशावरला हलवण्यात आली. त्याच सुमारास, ऑगस्टमध्ये, त्यांना कॅप्टन पदावर बढती मिळाली.ड६ त्यानंतरची दोन वर्षे त्यांनी फिरोजपूर येथील ट्रेनिंग बटालियनचे कंपनी कमांडर म्हणून घालवली, त्यानंतर त्यांची १/१४ पंजाबचे अॅडज्युटंट म्हणून बनू येथे बदली झाली.

१९४० मध्ये थोरात यांची स्टाफ कॉलेज, क्वेटा येथे प्रशिक्षणासाठी निवड झाली. पुढच्या वर्षी त्यांनी पदवी पूर्ण केली आणि त्यांची नियुक्ती लष्करी मुख्यालयातील ‘स्टाफ ड्युटीज’ संचालनालयात झाली. रेजिमेंटल ड्युटीवर नियुक्ती मिळवण्यास ते उत्सुक असल्याने त्यांची बदली कोल्हापूर संस्थानातील राजाराम रायफल्समध्ये करण्यात आली, जिथे त्यांनी एक वर्ष सेवा बजावली. ऑगस्ट १९४३ मध्ये त्यांना मेजर पदावर बढती मिळाली. त्यानंतर ते ४/१४ पंजाबमध्ये गेले, ज्यांनी ७ व्या भारतीय पायदळ डिव्हिजन अंतर्गत ११४ व्या भारतीय पायदळ ब्रिगेडचा भाग म्हणून जपानी सैन्याला नागा हिल्स मधून हुसकावून लावण्यात महत्त्वाची भूमिका बजावली होती. थोरात यांनी ४/१४ पंजाबसोबत छोट्या कारवायांमध्ये भाग घेतला आणि कोहिमाच्या लढाईनंतर त्यांची नियुक्ती २० व्या भारतीय पायदळ डिव्हिजन अंतर्गत ९/१४ पंजाबचे सेकंड-इन-कमांड म्हणून झाली, जी इम्फाळ मैदानावर युद्धात गुंतली होती. ९/१४ पंजाबच्या कमांडिंग ऑफिसरला संग्रहणी नामक आजार झाल्यामुळे थोरात यांनी तात्पुरते बटालियनचे नेतृत्व सांभाळले.



बटालियनचे नेतृत्व करण्याची त्यांची ही पहिलीच वेळ असल्याने, त्यांनी आपल्या सैनिकांसोबत एका लांब पल्ल्याच्या ‘रिकॉनिसन्स पेट्रोल’मध्ये (हेरगिरी गस्त) सहभाग घेतला, ज्याला त्यांच्या ब्रिगेड कमांडरने पसंती दिली नव्हती. नोव्हेंबर १९४४ मध्ये, थोरात यांची नियुक्ती ५१ व्या भारतीय पायदळ ब्रिगेड अंतर्गत २ री पंजाब रेजिमेंट च्या दुसऱ्या बटालियनचे कमांडिंग ऑफिसर म्हणून करण्यात आली. पूर्वीचे कमांडिंग ऑफिसर युद्धात मारले गेले होते आणि थोरात यांना आराकान मधील मौंगडौ येथे तातडीने पदभार स्वीकारायचा होता. ही ब्रिगेड ‘इंडियन ब्रिगेड’ म्हणून ओळखली जाऊ लागली कारण इतर ब्रिटीश भारतीय लष्करी ब्रिगेडमध्ये २ भारतीय आणि १ ब्रिटीश बटालियन असायच्या, तर ५१ व्या ब्रिगेडमध्ये तिन्ही भारतीय बटालियन होत्या. विशेष म्हणजे, ब्रिगेडमधील तिन्ही बटालियन्सचे कमांडिंग ऑफिसर्स भारतीय होते - के.एस. थिमय्या (८/१९ हैदराबाद), एल.पी. सेन (१६ बलुच), आणि थोरात. हे तिघे युद्धात तीव्र संघर्षात प्रत्यक्ष सहभागी झालेले मेजर पदाच्या वरचे मोजकेच भारतीय अधिकारी होते.

### कानगॉची लढाई

जानेवारी १९४५ मध्ये २/२ पंजाबने कानगॉच्या लढाईत भाग घेतला. ५१ व्या ब्रिगेडला जपानच्या भक्कम तटबंदी असलेल्या फळीचा पाडाव करण्याचे काम सोपवण्यात आले होते आणि थोरात यांनी तोफखाना आणि हवाई दलाच्या मदतीने आपल्या बटालियनच्या हल्ल्याचे नियोजन केले. तरीही, भातशेतीच्या चिखलातून जपानी सैन्याकडे कूच करताना बटालियनचे मोठे नुकसान झाले. एका प्रसंगी थोरात स्वतः प्रत्यक्ष समोरासमोरील युद्धात गुंतले होते, ज्यामध्ये त्यांनी एका तरुण जपानी अधिकाऱ्याला ठार मारून त्याची तलवार हस्तगत केली. सुरुवातीचा हल्ला यशस्वी झाल्यानंतर, थोरात यांनी त्यांच्या बटालियनची आगेकूच मर्यादित ठेवली आणि टेकडीच्या अर्ध्या भागावर आपले स्थान भक्कम केले. जपानी सैन्याची हल्ल्याखालील ठिकाण रिकामे करायचे आणि नंतर पुन्हा हल्ला करून ते परत मिळवायचे, जेणेकरून शत्रूचे जास्तीत जास्त नुकसान होईल, या युक्तीची त्यांना पूर्ण जाणीव होती. जेव्हा जपानचा प्रतिहल्ला झाला, तेव्हा तो बटालियनच्या सज्ज संरक्षण फळीने आणि हवाई हल्ल्यांनी परतवून लावला. त्यांच्या या नेतृत्व आणि शौर्याबद्दल थोरात यांना १५ नोव्हेंबर १९४५ रोजी डिस्टिंग्विश्ड सर्व्हिस ऑर्डर (Dएध्) प्रदान करण्यात आला. लढाईनंतर ५१ वी ब्रिगेड विश्रांतीसाठी आणि पुनर्रचनेसाठी भारतात परतली आणि २/२ पंजाब पोल्लाची येथे आली. भारतात काही काळ राहिल्यानंतर, ऑपरेशन झिपरचा भाग म्हणून ही बटालियन ब्रिटीश मलायाला जाणार होती. मात्र जपानने शरणागती पत्करल्यामुळे, हे आक्रमण सैन्य शांतता राखणाऱ्या सैन्यात रूपांतरित झाले.

आपली बटालियन कुआंतन येथे नेल्यानंतर थोरात यांची नियुक्ती २५ व्या भारतीय पायदळ डिव्हिजनचे असिस्टंट अॅडज्युटंट आणि क्वार्टरमास्टर जनरल म्हणून करण्यात आली. १९४६ च्या सुरुवातीला २५ वी डिव्हिजन बरखास्त होण्यासाठी भारतात परतली. थोरात यांना कर्नल पदावर बढती देण्यात आली आणि दिल्लीतील लष्करी मुख्यालयात ‘डेप्युटी डायरेक्टर पर्सोनेल सर्व्हिसेस’ म्हणून नियुक्त करण्यात आले. हा कार्यकाळ अल्प होता. त्याच वर्षाच्या शेवटी, त्यांची नियुक्ती ‘नॅशनल वॉर अकॅडमी कमिटी’चे सचिव म्हणून ब्रिगेडियर रँकवर करण्यात आली; या पदावर बढती मिळवणारे ते सहावे भारतीय होते. सचिव म्हणून त्यांच्या कार्यकाळातच पुण्याजवळील खडकवासला हे या अकादमीसाठी निश्चित करण्यात आले. ‘नॅशनल वॉर अकॅडमी’चे पुढे नॅशनल डिफेन्स अकॅडमी असे नामकरण करण्यात आले आणि १९५४ मध्ये खडकवासला येथे हलवण्यापूर्वी १९४९ मध्ये देहरादून येथे तिची स्थापना झाली. १९४७ च्या सुरुवातीला थोरात यांची नियुक्ती रांची येथील १६१ ब्रिगेडचे कमांडर म्हणून झाली.

### स्वातंत्र्योत्तर काळ

भारताच्या फाळणीनंतर, ऑगस्ट १९४७ मध्ये थोरात यांची नियुक्ती लाल किल्ल्यावरील नवीन लष्करी मुख्यालयात ‘डायरेक्टर ऑफ स्टाफ ड्युटीज अँड वेपन्स अँड इक्विपमेंट’ म्हणून करण्यात आली. या संचालनालयाला नव्याने स्थापन झालेल्या पाकिस्तानच्या अधिराज्याला शस्त्रे, दारूगोळा, वाहने आणि उपकरणे यांची वर्गवारी करून पाठवण्याचे काम करावे लागले. त्यांनी नोंदवले की, पाकिस्तानात पाठवली जाणारी हीच शस्त्रे आणि दारूगोळा त्यांनी १९४७ च्या भारत-पाकिस्तान युद्धात भारतीय सैन्याविरुद्ध वापरला. ३१ जानेवारी १९४८ रोजी थोरात यांना मेजर जनरल पदावर बढती देण्यात आली आणि दिल्ली क्षेत्राचे ‘जनरल ऑफिसर कमांडिंग’ म्हणून नियुक्त करण्यात आले. जीओसी म्हणून त्यांनी ऑगस्ट १९४८ मध्ये पहिल्या स्वातंत्र्यदिन संचलनाचे नेतृत्व केले.

# देशाचे एकमेव अपक्ष राष्ट्रपती व्ही.व्ही. गिरी

**वराहगिरी वेंकट गिरी (व्ही. व्ही. गिरी) हे भारताचे चौथे राष्ट्रपती, पहिले श्रममंत्री (खासदार म्हणून लोकसभेतून) आणि स्वातंत्र्यलढ्यातील एक थोर नेते होते. १० ऑगस्ट १८९४ रोजी जन्मलेले गिरी हे देशाचे एकमेव अपक्ष राष्ट्रपती म्हणून निवडून आलेले नेते होते. त्यांना १९७५ मध्ये देशाचा सर्वोच्च ‘भारतरत्न’ हा पुरस्कार मिळाला. २४ ऑगस्ट १९६९ ते २४ ऑगस्ट १९७४ पर्यंत त्यांनी भारताचे चौथे राष्ट्रपती म्हणून कार्यभार सांभाळला. राष्ट्रपती होण्यापूर्वी डॉ. झाकिर हुसेन यांच्या निधनानंतर त्यांनी काही काळ कार्यवाहक राष्ट्रपती म्हणूनही काम पाहिले होते. १९५२ च्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीत ते मद्रास राज्यातील पाथापटनम मतदारसंघातून पहिल्या लोकसभेवर खासदार म्हणून निवडून आले होते. पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या मंत्रिमंडळात त्यांनी १९५२ ते १९५४ या काळात केंद्रीय कामगार (श्रम) मंत्री म्हणून काम केले.**

कामगार हिराच्या धोरणांवर मतभेद झाल्यामुळे त्यांनी १९५४ मध्ये मंत्रिपदाचा राजीनामा दिला होता. त्यांनी उत्तर प्रदेश, केरळ आणि कर्नाटक (म्हैसूर) या राज्यांचे राज्यपाल म्हणूनही सेवा बजावली. १३ मे १९६७ ते ३ मे १९६९ या काळात ते भारताचे उपराष्ट्रपती होते.ते भारताच्या कामगार आणि ट्रेड युनियन चळवळीचे एक प्रमुख नेते होते. त्यांनी ‘ऑल इंडिया रेल्वेमेन फेडरेशन’ आणि ‘एआयटीयुसी’चे अध्यक्षपद भूषवले. २४ जून १९८० रोजी त्यांचे चेन्नई (मद्रास) येथे निधन झाले.

बेरहामपूरमध्ये एका तेलगू ब्राह्मण कुटुंबात जन्मलेल्या गिरी यांनी खल्लिकोट कॉलेजमध्ये आपले उच्च शिक्षण पूर्ण केले, जिथे ते विद्यार्थी संघटनेवर निवडून आले आणि स्वातंत्र्य चळवळीत सक्रिय होते . १९१३ मध्ये ते युनिव्हर्सिटी कॉलेज डब्लिन आणि द ऑनरेबल सोसायटी ऑफ किंग्स इन्स, डब्लिन येथे कायद्याचा अभ्यास करण्यासाठी आयर्लंडला गेले. जून १९१६ मध्ये त्यांना आयरिश बारमध्ये प्रवेश मिळाला, परंतु त्यांनी बीएचा अभ्यास पूर्ण केला नाही . भारतात परतल्यावर १९१६ मध्ये त्यांनी मद्रास



उच्च न्यायालयात प्रवेश घेतला. गिरी भारतीय राष्ट्रीय काँग्रेस आणि होम रूल चळवळीचे सदस्य बनले. १९२० मध्ये असहकार चळवळीचा भाग म्हणून आपली वकिली सोडून दिल्यानंतर, १९२२ मध्ये निदर्शनांसाठी त्यांना अटक करण्यात आली. गिरी भारतीय कामगार चळवळीशी जवळून संबंधित होते आणि १९२६ मध्ये ते अखिल भारतीय ट्रेड युनियन काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून निवडून आले. गिरी १९३४ मध्ये इम्पेरियल लेजिस्लेटिव्ह असेंब्लीचे सदस्य म्हणून निवडून आले आणि १९३७ मध्ये सी. राजगोपालाचारी यांच्या नेतृत्वाखाली कामगार आणि उद्योग मंत्री बनले. १९३९ मध्ये भारताला दुसऱ्या महायुद्धात सामील केल्याच्या निषेधार्थ काँग्रेसच्या मंत्रिमंडळांनी राजीनामा दिल्यानंतर, गिरी कामगार चळवळीत परतले आणि नंतर त्यांना अटक झाली. १९४१ पर्यंत त्यांनी १५ महिने तुरुंगात घालवले. ‘भारत छोडो’ आंदोलन सुरू झाल्यानंतर त्यांना पुन्हा अटक झाली आणि १९४२ ते १९४५ पर्यंत तीन वर्षे त्यांना तुरुंगवास भोगावा लागला. १९४६ च्या सार्वत्रिक निवडणुकीत, गिरी मद्रास विधानसभेवर निवडून आले आणि टी. प्रकाशम यांच्या नेतृत्वाखाली पुन्हा कामगार खात्याचे मंत्री बनले. १९४७ ते १९५१ पर्यंत, त्यांनी सिलोनमधील भारताचे पहिले उच्चायुक्त म्हणून काम पाहिले. गिरी १९५१ मध्ये पाथापटनम लोकसभा मतदारसंघातून पहिल्या लोकसभेवर निवडून आले. १९५२ पासून १९५४ मध्ये राजीनामा देईपर्यंत त्यांनी नेहरू सरकारमध्ये केंद्रीय कामगार मंत्री म्हणून काम केले . १९५७ च्या निवडणुकीत पाथापटनम मतदारसंघात त्यांचा पराभव झाला आणि त्याच वर्षी त्यांची उत्तर प्रदेशचे राज्यपाल म्हणून नियुक्ती झाली. त्यानंतर त्यांनी १९६० ते १९६५ पर्यंत केरळचे राज्यपाल आणि १९६५ ते १९६७ पर्यंत कर्नाटकचे राज्यपाल म्हणून काम पाहिले. १९६७ च्या निवडणुकीत गिरी उपराष्ट्रपती म्हणून निवडून आले. राष्ट्रपती झाकीर हुसेन यांच्या निधनानंतर, गिरी मे १९६९ मध्ये हंगामी राष्ट्रपती बनले आणि त्यानंतरची राष्ट्रपती निवडणूक अपक्ष उमेदवार म्हणून लढवण्यासाठी त्यांनी जुलैमध्ये राजीनामा दिला. पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी दिलेल्या पाठिंब्यामुळे त्यांना निवडणुकीत विजय मिळवण्यास मदत झाली आणि गिरी यांनी १९६९ ते १९७४ या काळात भारताचे राष्ट्रपती म्हणून काम पाहिले. गांधींनी १९७४ मध्ये त्यांना पुन्हा नामनिर्देशित न करण्याचा निर्णय घेतला. त्यांचा पूर्ण कार्यकाळ संपल्यानंतर, भारत सरकारने १९७५ मध्ये गिरी यांना भारतरत्न पुरस्काराने सन्मानित केले. १९८० मध्ये वयाच्या ८५ व्या वर्षी हृदयविकाराच्या झटक्याने त्यांचे निधन झाले.

# नागरिकांवर दंडाची सक्ती; प्रशासनाच्या निष्काळजीपणाचे काय?

वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या नागरिकांवर दंडात्मक कारवाईचा बडगा उगारला जात असताना दुसरीकडे शहरातील रस्त्यांची दुरवस्था, बंद पडलेले वाहतूक सिग्नल, अतिक्रमित फूटपाथ, अपुरे पथदिवे, रस्त्यांवरील खड्डे, सांडपाणी तसेच विविध कामांसाठी खोदून ठेवलेले आणि वेळेवर दुरुस्त न केलेले रस्ते यासाठी जबाबदार कोण, असा संतप्त सवाल समाजसेवक गजानन हरणे यांनी उपस्थित केला आहे.

वाहतूक नियमांचे पालन करणे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. मात्र नागरिकांवर नियमांची अंमलबजावणी करताना रस्ते, वाहतूक व्यवस्था आणि मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याची जबाबदारी प्रशासनाचीही आहे. नियम केवळ नागरिकांसाठीच आहेत का? प्रशासनालाही त्याची जबाबदारी आणि उत्तरदायित्व लागू असायला नको का? असा प्रश्न हरणे यांनी उपस्थित केला.

हेल्मेटचा वापर न केल्यास दंड, नो-पार्किंगमध्ये वाहन उभे केल्यास दंड, वाहनाचा विमा नसल्यास दंड, मद्यपान करून वाहन चालविल्यास मोठा दंड, नो-एंट्रीमध्ये वाहन नेल्यास दंड, वाहन चालवताना मोबाईल वापरल्यास दंड तसेच प्रदूषण प्रमाणपत्रासंदर्भात दंड अशा विविध नियमांची अंमलबजावणी केली जाते. नागरिकांनी वाहतूक नियमांचे पालन करणे आवश्यक आहे, याबाबत दुमत नाही. मात्र शहरातील वाहतूक सिग्नल बंद पडले असतील, रस्त्यांवर मोठमोठे खड्डे असतील, फूटपाथवर अतिक्रमणे असतील, रात्री पथदिवे बंद असतील, रस्त्यांवर कचरा आणि सांडपाणी साचले असेल, तर त्याची जबाबदारी कोणाची? असा सवालही त्यांनी केला. विविध विकासकामे किंवा जलवाहिनी, भूमिगत वीजवाहिनी, दूरसंचार आदी कामांसाठी रस्ते खोदले जातात. मात्र काम पूर्ण झाल्यानंतर अनेकदा रस्ता पूर्ववत करण्यास विलंब होतो किंवा निकृष्ट पद्धतीने दुरुस्ती केली जाते. त्यामुळे वाहनचालकांना त्रास सहन करावा लागतो. अशा परिस्थितीत अपघात झाला किंवा नागरिक जखमी झाला तर त्याची जबाबदारी निश्चित करण्याची यंत्रणा प्रभावीपणे कार्यरत आहे का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

रस्त्यावरील खड्ड्यामुळे एखादा दुचाकीस्वार पडून जखमी झाला, भटक्या जनावरामुळे अपघात झाला, पथदिवे नसल्यामुळे दुर्घटना घडली किंवा अतिक्रमित फूटपाथमुळे पादचाऱ्याला रस्त्यावरून जीव धोक्यात घालून चालावे लागले, तर या निष्काळजीपणाची जबाबदारी निश्चित होणार आहे का? असा सवाल गजानन हरणे यांनी केला आहे.

### नियम सर्वांसाठी समान असावेत

नागरिकांनी वाहतूक नियमांचे पालन करावे, हेल्मेट वापरावे, वाहनाचा विमा व प्रदूषण प्रमाणपत्र अद्ययावत ठेवावे, मद्यपान करून वाहन चालवू नये, हे अत्यंत आवश्यक आहे. परंतु त्याचवेळी प्रशासनानेही आपली कर्तव्ये पार पाडली पाहिजेत. ‘नागरिकांनी नियम पाळावेत’ हा आग्रह योग्य आहे; पण ‘प्रशासनानेही आपली कर्तव्ये पार पाडावीत’ हा आग्रहही तितकाच योग्य आहे. दंड वसूल करणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे; मात्र त्याचबरोबर नागरिकांना सुरक्षित आणि सुस्थितीत रस्ते, योग्य वाहतूक व्यवस्था, पथदिवे, फूटपाथ आणि मूलभूत सुविधा देणे हीदेखील प्रशासनाचीच जबाबदारी आहे.

### दंडाबरोबर उत्तरदायित्वही निश्चित करा

नागरिकांकडून नियमभंग झाला तर दंड होतो. मग प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे नागरिकांच्या जीविताला धोका निर्माण झाला तर संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित होणार नाही का? दंडाची पावती नागरिकांच्या हातात देताना प्रशासनाने स्वतःच्या कामगिरीचीही ‘पावती’ जनतेला द्यावी, अशी मागणी समाजसेवक गजानन हरणे यांनी केली आहे.

नागरिक कर भरतात, विविध शुल्क भरतात, वाहतूक नियमांचे उल्लंघन झाल्यास दंडही भरतात. या पैशातूनच शासन आणि स्थानिक स्वराज्य संस्थांना महसूल मिळतो. त्यामुळे नागरिकांना केवळ नियमांचे पालन करण्यास सांगण्याऐवजी त्यांच्या सुरक्षिततेची आणि मूलभूत सुविधांची हमी देणे ही प्रशासनाची प्राथमिक जबाबदारी आहे.

‘जनताच प्रत्येक गोष्टीसाठी दोषी आणि प्रशासन मात्र कायम निर्दोष’ अशी मानसिकता बदलली पाहिजे. नियम नागरिकांसाठी आहेत तसेच प्रशासनासाठीही कर्तव्य, उत्तरदायित्व आणि पारदर्शकतेचे नियम असले पाहिजेत. नागरिकांच्या सुरक्षेशी संबंधित त्रुटींकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित विभागांची जबाबदारी निश्चित करून आवश्यक ती कारवाई करण्याची मागणी निर्भय बनो जन आंदोलन व राष्ट्रीय लोक आंदोलन चे संयोजक समाजसेवक गजानन हरणे यांनी केली आहे. नागरिकांनी नियम पाळावेत; पण प्रशासनानेही कर्तव्य पाळावे. दंडासोबत उत्तरदायित्वही असावे हीच खरी लोकशाहीची अपेक्षा आहे.

# जल पुनर्भरण काळाची गरज; मात्र दुर्लक्षित

“जल हेच जीवन” हे वाक्य आपण लहानपणापासून ऐकत आलो आहोत. पाण्याशिवाय मानवी जीवन किंवा कोणत्याही सजीव सृष्टीची कल्पना करणे अशक्य आहे. परंतु, आजच्या आधुनिक युगात वाढती लोकसंख्या, औद्योगिकीकरण, शहरीकरण आणि निसर्गाचा अनियंत्रित वापर यांमुळे संपूर्ण जग गंभीर जलसंकटाच्या उंबरठ्यावर उभे आहे. दरवर्षी उन्हाळा सुरू झाला की गावोगावी, शहरांमध्ये पाण्याची भीषण टंचाई निर्माण होते. या समस्येवर कायमस्वरूपी आणि शाश्वत उपाय शोधायचा असेल, तर जल पुनर्भरण (Groundwater Recharge) ही आजच्या काळाची सर्वात मोठी आणि तातडीची गरज बनली आहे.




### जल पुनर्भरणाची गरज का निर्माण झाली?

१. खालावत चाललेली भूजल पातळी: गेल्या काही दशकांत कूपनलिका (बोअरवेल) आणि विहिरींचा अमर्याद वापर वाढला आहे. जमिनीत जितके पाणी मुरत नाही, त्यापेक्षा कितीतरी पटीने जास्त पाणी उपसले जात आहे. परिणामी, शेकडो फूट खोल जाऊनही पाणी लागत नाही.

**२. शहरीकरण आणि कॉंक्रिटीकरण:** शहरांमध्ये सिमेंटचे रस्ते, डांबरीकरण आणि उंच इमारतींमुळे मोकळी जमीन उरलेली नाही. यामुळे पावसाचे पाणी जमिनीत मुरण्याऐवजी नाल्यांमधून वाहून समुद्राला जाऊन मिळते आणि वाया जाते.

**३. हवामान बदल आणि अनियमित पाऊस:** हवामान बदलामुळे पावसाचे स्वरूप बदलले आहे. कमी वेळात जास्त पाऊस पडण्याचे प्रमाण वाढले आहे. यामुळे पाणी जमिनीत मुरण्यास वेळ मिळत नाही आणि ते वाहून जाते.

### जल पुनर्भरणाचे प्रमुख फायदे

**भूजल पातळीत वाढ:** जमिनीत पाण्याचा साठा वाढल्यामुळे कोरड्या पडलेल्या विहिरी आणि बोअरवेल पुन्हा प्रवाहित होतात.

**पाण्याच्या दर्जात सुधारणा:** भूगर्भात पाणी साचल्याने पाण्यातील क्षारांचे प्रमाण कमी होते आणि पिण्याच्या पाण्याचा दर्जा सुधारतो.

**दुष्काळावर मात:** पावसाळ्यात साठवलेले भूजल उन्हाळ्यात किंवा दुष्काळी परिस्थितीत अत्यंत उपयुक्त ठरते.

**शेती आणि उद्योगांना आधार:** भूजल पातळी चांगली राहिल्याने शेतीसाठी वर्षभर पाणी उपलब्ध राहते, ज्यामुळे शेतकऱ्यांचे स्थलांतर रोखण्यास मदत होते. आपले उत्तरदायित्व आणि उपाय जल पुनर्भरण ही केवळ शासनाची किंवा प्रशासनाची जबाबदारी नाही, तर ते प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे.

**छतावरील पाणी साठवणे:** प्रत्येक घरमालकाने आणि गृहनिर्माण संस्थांनी (Housing Societies) रेनवॉटर हार्वेस्टिंग यंत्रणा उभारणे अनिवार्य केले पाहिजे.

**‘पाणी अडवा, पाणी जिरवा’:** ग्रामीण भागात नाला बांधकाम, समपातळी चर (Continuous Contour Trenches), आणि जलयुक्त शिवारासारखे उपक्रम लोकसहभागातून राबवले पाहिजेत.

**पाण्याचा अपव्यय टाळणे:** पुनर्भरणासोबतच पाण्याचा अतिवापर आणि अपव्यय रोखणे तितकेच महत्त्वाचे आहे.

**निष्कर्ष :** पाणी हे निसर्गाने दिलेले अनमोल रत्न आहे. ते निर्माण करता येत नाही, पण ते जतन नक्कीच करता येते. जर आपण आज पावसाच्या पाण्याचा प्रत्येक थेंब अडवून जमिनीत जिरवला नाही, तर येणाऱ्या काळात पाण्यासाठी गंभीर संघर्षाला सामोरे जावे लागेल. “पाणी वाचवा, जीवन वाचवा” हा केवळ एक नारा न राहता ती आपल्या दैनंदिन जीवनाची संस्कृती बनली पाहिजे. जल पुनर्भरण करूनच आपण आपले आणि भावी पिढीचे भविष्य सुरक्षित करू शकतो.

### जल पुनर्भरण म्हणजे काय?

पावसाचे पाणी जमिनीवरून वाहून न जाऊ देता, विविध शास्त्रीय आणि सोप्या पद्धतींचा वापर करून ते पुन्हा जमिनीत मुरवणे म्हणजेच जल पुनर्भरण होय. निसर्गात पाऊस पडल्यानंतर पाणी जमिनीत मुरण्याची एक नैसर्गिक प्रक्रिया असते. परंतु, मानवाने केलेल्या बदलांमुळे या प्रक्रियेत अडथळे निर्माण झाले आहेत. जल पुनर्भरणाच्या माध्यमातून आपण छतावरील पावसाचे पाणी साठवून (Rainwater Harvesting), शोषखड्डे (Soak Pits) तयार करून, शेततळी, वनराई बंधारे किंवा विहीर व बोअरवेल पुनर्भरण पद्धतीचा वापर करून भूगर्भातील पाण्याचा साठा वाढवू शकतो.

सिटी न्यूज अकोला

सोमवार, दि. १० ऑगस्ट २०२६ Web. http://epaper:citynewssuperfast.com



# महानगरात रॅम्पकॉन-2026 प्रदर्शनीचे आयोजन

## 25 ते 27 डिसेंबर दरम्यान होणार बांधकाम विश्वाची मांदियाळी

प्रतिनिधी १० ऑगस्ट

**अकोला:** अकोला शहराच्या विकासाच्या दिशेने आणखी एक महत्त्वपूर्ण पाऊल म्हणून असो. ऑफ कन्सल्टिंग सिव्हिल इंजिनियर्स अकोला शाखेच्या वतीने रॅम्पकॉन-२०२६या भव्य बांधकाम प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. २५ ते २७डिसेंबर २०२६ दरम्यान गोरक्षण संस्था ग्राउंड, अकोला येथे हे प्रदर्शन होणार असून, यंदा सुमारे १.७० लाखांहून अधिक नागरिक भेट देतील, अशी अपेक्षा आयोजकांनी व्यक्त केली आहे. रॅम्पकॉन हे केवळ बांधकाम साहित्याचे प्रदर्शन नसून बांधकाम क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञान, गुणवत्ता, नाविन्य व व्यावसायिक संधी यांना एकाच व्यासपीठावर आणणारा महत्त्वपूर्ण उपक्रम माणून आपली ओळख निर्माण करत आहे. यात एकाच छताखाली बांधकामाशी संबंधित विविध उत्पादने आणि सेवांची विस्तृत श्रेणी नागरिकांना पाहता व समजून घेता येणार आहे. यामध्ये बांधकाम साहित्य, टाइल्स, संनिटरी व प्लंबिंग, इलेक्ट्रिकल उत्पादने, दरवाजे-खिडक्या, पेंट्स, हार्डवेअर, इंटिरियर व फिनिशिंग उत्पादने, आधुनिक बांधकाम तंत्रज्ञान तसेच पर्यावरणपूरक बांधकाम पद्धतीचे प्रदर्शन करण्यात येणार आहे. घर बांधण्याचे नियोजन करणाऱ्या नागरिकांपासून ते मोठ्या व्यावसायिक व औद्योगिक प्रकल्पांपर्यंत सर्वांसाठी हे प्रदर्शन उपयुक्त ठरणार आहे.

इंजिनिअर्स, आर्किटेक्ट्स, बिल्डर्स आणि व्यावसायिकांसाठी विशेष संधी या प्रदर्शनाचा लाभ सिव्हिल इंजिनिअर्स, आर्किटेक्ट्स, बिल्डर्स, डेव्हलपर्स, कंत्राटदार, इंटिरियर डिझायनर्स, उद्योग क्षेत्रातील व्यावसायिक तसेच पांधकामाशी संबंधित विविध तज्ज्ञांना होणार आहे. नवीन उत्पादने, अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि बदलत्या बांधकाम पद्धतीची प्रत्यक्ष माहिती मिळण्याबरोबरच विविध कंपन्या व व्यावसायिकांमध्ये नवीन व्यावसायिक संपर्क निर्माण होण्यासही रॅम्पकॉन महत्त्वपूर्ण ठरणार असून अकोल्याच्या आर्थिक विकासाला नवी गती मिळणार आहे. बांधकाम क्षेत्राचा थेट संबंध अनेक उद्योग व व्यवसायांशी आहे, उत्पादक, वितरक, विक्रेते, वाहतूकदार, कारागीर, कंत्राटदार, इंजिनिअर्स, आर्किटेक्ट्स आणि सेवा क्षेत्रातील हजारो व्यावसायिक या क्षेत्राशी जोडलेले आहेत. त्यामुळे रॅम्पकॉन- सारख्या मोठ्या प्रदर्शनामुळे स्थानिक व्यापार, रोजगार, व्यवसायाच्या नवीन संधी आणि औद्योगिक नेटवर्किंगला चालना मिळण्यास मदत होणार आहे. अकोला व विदर्भातील बांधकाम क्षेत्राच्या वाढीसाठी हे प्रदर्शन एक प्रभावी व्यासपीठ ठरणार आहे. आधुनिक व पर्यावरणपूरक बांधकामाची दिशा, बांधकाम क्षेत्र झपाट्याने बदलत असून आज ऊर्जा बचत, पर्यावरणपूरक साहित्य, स्मार्ट तंत्रज्ञान, आधुनिक बांधकाम पद्धती आणि गुणवत्तापूर्ण उत्पादनांना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. रॅम्पकॉन च्या माध्यमातून या आधुनिक बदलांची माहिती सर्वसामान्य नागरिकांपासून ते बांधकाम क्षेत्रातील तज्ज्ञांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. रॅम्पकॉन ही केवळ प्रदर्शनी नसून अकोल्याच्या विकासाचा उत्सव आहे.

# अखिल भारतीय मराठा महासंघ जिल्हा कार्यकारिणीचे केले पुनर्गठन

- प्रदीप मधुकरराव लुगडे महानगराध्यक्षपदी, विपुल माने युवक अध्यक्ष
- समाजाभिमुख कामकाज करण्याची नव्या कार्यकारिणीची ग्वाही

प्रतिनिधी १० ऑगस्ट

**अकोला :** अखिल भारतीय मराठा महासंघाची जिल्हा व महानगर शाखेची आढावा बैठक शनिवार दि. ८ रोजी रतनलाल प्लॉट स्थित विभागीय कार्यालयात पार पडली. महासंघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष विनायकराव पवार यांचे अध्यक्षतेत विभागीय अध्यक्ष योगेश थोरात, जिल्हाध्यक्ष संजय सूर्यवंशी, महिला विभागीय अध्यक्ष कल्पना बिडवे, उपाध्यक्ष माधुरी वाघमारे, महिला जिल्हाध्यक्ष सिंधुताई पवार यांच्या प्रमुख उपस्थित संपन्न झालेल्या कार्यकर्त्यांच्या सभेत जिल्हा व महानगर कार्यकारिणीचे पुनर्गठन करण्यात आले.

अखिल भारतीय मराठा महासंघाची जिल्हा व महानगर शाखेची आढावा बैठक घेण्यात आली. महानगरची नूतन कार्यकारणी गठीत करण्यात येऊन प्रदीप मधुकरराव लुगडे यांची अकोला महानगर अध्यक्षपदी, तर युवक अध्यक्षपदी विपुल माने यांची नियुक्ती करण्यात आली. कार्यकारिणीत उपाध्यक्ष पदी नितीन देशमुख, अनिल मोटे ,अनिल केळकर ,प्रवीण शिंदे, अजिंक्य काळे, राहुल मोरे यांची निवड तर सरचिटणीस वसंत खराडे, कोषाध्यक्ष अनंत टाले , संघटकपदी श्याम देशमुख, सह संघटक नितिन पाटील, सोशल मिडिया प्रमुख जयेश घाटोळ, प्रसिध्दी प्रमुख अजय कदम, युवक कोषाध्यक्ष म्हणून विशाल तायडे , पश्चिम विभाग अध्यक्ष पदावर अंकित कदम यांची नियुक्ती करण्यात आली आहे. जिल्हाध्यक्ष संजय सूर्यवंशी यांच्या नेतृत्वातील कार्यकारिणीची पुनर्रचना करण्यात आली.





**सर्वत्र होत आहे अभिनंदन**

छत्रपती शिवाजी महाराज जयंती, वृक्षारोपण, शालेय साहित्य वाटप, समाजातील गुणवंतांचा सत्कार समारंभ, सामाजिक कार्याची आवड असलेले प्रदीप भाऊ मधुकरराव लुगडे यांची अखिल भारतीय मराठा महासंघ अकोला महानगर अध्यक्ष पदी निवड झाल्याबद्दल समाजातील सर्व क्षेत्रातील मित्र परिवाराकडून अभिनंदन होत आहे. समाजाच्या कार्यामध्ये विवाह मंडळ, सोयरीक पुस्तिका, विवाह जुळवणे वधू-वर परिचय मेळावा आदी सामाजिक कार्य करणारे प्रदीप मधुकरराव लुगडे यांचे सर्वत्र अभिनंदन करण्यात येत आहे.

सरचिटणीस अरुण खोटरे ,कोषाध्यक्ष गजानन खराडे ,उपाध्यक्ष विठ्ठलराव वाघ यांना कायम ठेवण्यात आले. श्रीकांत सरोदे डॉ. अजय काळे ,अनिल क्षीरसागर, राजेश देशमुख प्रविन कदम यांची उपाध्यक्ष तर विक्रांत वाघमारे यांची सोशल मीडिया प्रमुख तर भावना जाधव यांची महिला उपाध्यक्ष म्हणून नव्याने निवड करण्यात आली. युवा जिल्हा उपाध्यक्ष प्रतिक खराडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यावेळी विभागीय सोशल मीडिया प्रमुख सचिन पाटील गोमाशे, सोनू बापू देशमुख, पंडित चौधरी, बाळकृष्ण जाधव, जितेंद्र गावंडे, माधुरी वाघमारे, राखी पटेकर, आरती निकाळजे, अनिता गावंडे, वैशाली कदम, छायाताई पवार, रंजना रंभेकर , उज्वला बावसकर,संतोष मोटे, श्रीराम नळकांडे,गजानन थिटे, सतीश आहळे, गगन ओबेराय, सुनिल बोंडे,अनिल निंबाळकर, मनीष पटेल संजय मांडवे, निलेश इंगळे, अनिल कानगुडे, श्याम बगैरे, राम अवताडे, विजय ठाकूर ,राजेश सटाले, अजय कस्तुरकर, प्रितेश घाटोळ, सर्वेश लुगडे, सार्थक कदम, गणेश जाधव आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचलन माधुरी वाघमारे यांनी तर आभार प्रदर्शन राजेश देशमुख यांनी केले. असे प्रसिध्दी पत्रकात सोशल मिडिया प्रमुख सचिन पाटील गोमासे यांनी कळविले आहे.

# बापूसाहेब देशमुख अनंतात विलीन



प्रतिनिधी १० ऑगस्ट

**मुर्तीजापूर :** संत गाडगेबाबांनी दिलेला संदेश दशसूत्रीला आयुष्याच्या शेवटच्या श्वासापर्यंत जपणारे व गोरगरीब तसेच अपंग ची सेवा करणारे स्व. बापूसाहेब देशमुख यांचे शनिवारी उत्तररात्री हृदयविकाराच्या धक्क्याने दुःखद निधन झाले. रविवारी त्यांच्या पार्थिवावर मुर येथील हिंदु स्मशानभूमीत हजारो शोकाकुल नागरिक, अनुयायी, सामाजिक कार्यकर्ते, आप्तेष्ट आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या अंत्यसंस्कार प्रसंगी आमदार हरीश पिंपळे, दै. देशोन्नतीचे संचालक ऋषिकेश पोहरे यांनी श्रध्दांजली वाहिली. गाडगे बाबा मिशनचे चेअरमन मधुसूदन मोहीते पाटील, माजी आमदार भैय्यासाहेब तिडके, दर्यापूर कृउबा सभापती सुनील पाटील गावंडे, शिंदे मॅडम, माजी मुख्याध्यापक किशोर चौधरी, शिवसेना शहर प्रमुख विनायक गुल्हाने, प्रबोधनकार भारत रेडे, बाळासाहेब नगराध्यक्ष हर्षल साबळे, रतन महाराज महाजन, नितेश वानखडे, शुकदास महाराज गाडेकर, लायन्स क्लब अध्यक्ष सतीश अग्रवाल, सुभाष दूध डेरी संचालक प्रशांत हजारी, नगरपरिषद उपाध्यक्ष रोहित अवलवार, नगरसेवक सचिन देशमुख, पंकज कांबे, संदीप सरनाईक, संजय डागा, व्यंकटेश बालाजी संस्थांचे अध्यक्ष प्रा. अवधूत ढेरे, राम खंडारे यांनी साश्रूपुर्ण श्रध्दांजली वाहिली.

# अकोला महापालिकेचा शाश्वत ऊर्जा निर्मिती प्रकल्प

प्रतिनिधी १० ऑगस्ट

**अकोला :** महानगरपालिका शाश्वत ऊर्जा पायाभूत सुविधांचा विस्तार करत असताना, त्यात जैव-ऊर्जा निर्मिती प्रकल्प तयार करत आहे, जे घनकचरा आणि स्थानिक सेंद्रिय, कृषी किंवा दुग्धजन्य कचऱ्यावर प्रक्रिया करून स्वच्छ इंधन तयार करतात. हा डोम अकोल्यापासून ७ किमी अंतरावर हिंगणा येथे नव्याने विकसित होत आहे.आमदार रणधीर सावरकर, खासदार अनुप धोत्रे, पालकमंत्री एडवोकेट आकाश फुंडकर, आमदार वसंत खंडेलवाल, सभापती विजय अग्रवाल, महापौर शारदाताई खेडकर, जयंत मसने, माजी महापौर अर्चनाताई मसने, आयुक्त सुनील लहाने यांच्या नेतृत्वात सुरू असलेला हा प्रकल्प अकोला महानगराला संजीवनी ठरणार आहे.



टीका करणे सोपा आहे परंतु प्रत्यक्षात काम करणे याला इच्छाशक्ती आणि निधी आणण्याची संकल्प सिद्धी लागते भारतीय जनता पक्ष नेतृत्व अकोला जिल्ह्याच्या विकासासाठी शहराच्या मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने सदैव तत्पर राहतात. कचऱ्यापासून ऊर्जा, दुग्धव्यवसाय आणि सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पांमध्ये मोठ्या प्रमाणात बायोगॅस किंवा संकुचित बायोगॅस (Compressed bio-gas,CBG) साठवण्यासाठी मोठ्या प्रमाणावर वापरला जातो.

त्यामध्ये हवामानापासून संरक्षणासाठी एक बाह्य आवरण आणि वायू सुरक्षितपणे साठवण्यासाठी प्रसरण/आकुंचन पावणारे एक आंतरिक आवरण असते अशी माहिती दिली.

# दिव्यांगांचे 4 महिन्यांचे मानधन थकीत; पोर्टल बंद असल्याने लाभार्थी त्रस्त



प्रतिनिधी १० ऑगस्ट

**हिवरखेड :** बेलखेड. परिसरातील दिव्यांग बांधव मागील चार महिन्यांपासून शासनाच्या मानधनापासून वंचित असून, त्यांच्यावर अत्यंत कठीण आर्थिक परिस्थिती व उपासमारीची वेळ आली आहे. थकीत मानधन तात्काळ जमा करावे, तांत्रिक अडचणींमुळे बंद पडलेले पोर्टल पूर्ववत सुरू करावे आणि ग्रामपंचायत बेलखेड मार्फत ५% दिव्यांग निधीचे वाटप करण्यात यावे, या प्रमुख मागण्यांसाठी दिव्यांग संघटना, बेलखेडच्या वतीने तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले. दिव्यांग व्यक्तींना मिळणारे शासकीय मानधन हे त्यांच्या रोजच्या उपजीविकेचे आणि औषधोपचाराचे मुख्य साधन आहे. मात्र, गेल्या चार महिन्यांपासून मानधन न मिळाल्याने दिव्यांगांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. यासंदर्भात तहसील कार्यालयात विचारणा केली असता "पोर्टल/साईट बंद आहे" आणि "हे तांत्रिक काम जिल्हाधिकारी कार्यालयातून बंद आहे" अशी उत्तरे देऊन दिव्यांगांना परत पाठवले जात आहे. याशिवाय, शासन निर्णयानुसार स्थानिक स्वराज्य संस्थांनी वार्षिक निधीतून किमान ५% निधी दिव्यांगांच्या कल्याणासाठी खर्च करणे बंधनकारक असताना, ग्रामपंचायत बेलखेडकडून अद्याप या ५% निधीचे वाटप करण्यात आलेले नाही.

# चार गुन्हेगारांना तीन जिल्ह्यांतून हद्दपार

**मूर्तिजापूर :** सण-उत्सवाच्या काळात शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, तसेच नागरिकांच्या सुरक्षिततेला कोणताही धोका निर्माण होऊ नये, यासाठी शहर पोलिसांनी सराईत गुन्हेगारांविरुद्ध कठोर पावले उचलली आहेत. पोलिस स्टेशन हद्दीत विविध प्रकारचे गुन्हे करून पोलिसांच्या रडारवर असलेल्या चार सराईत गुन्हेगारांना अकोला, अमरावती व वाशिम या तीन जिल्ह्यांतून हद्दपार करण्यात आले आहे. हद्दपार करण्यात आलेल्या गुन्हेगारांमध्ये फैजान अहमद गुलाम नबी, रा. कमासपुरा, मूर्तिजापूर याचा समावेश असून त्याला मूर्तिजापूर शहर पोलीस स्टेशन हद्दीतून एक वर्षासाठी हद्दपार करण्यात आले आहे. पवन संजय गुंजाळ, रा. वडापुरा, स्टेशन विभाग, मूर्तिजापूर याच्यावरही एक वर्षासाठी हद्दपारीची कारवाई करण्यात आली आहे. दिपक शामराव अवघड, रा. शेलू बाजार, ता. मूर्तिजापूर, जि. अकोला याच्यावरही कारवाई करण्यात आली असून त्याला सहा महिन्यांसाठी हद्दपार करण्यात आले आहे. तर सचिन विजय दुबे, रा. सत्तारंग भवन परिसर, स्टेशन विभाग, मूर्तिजापूर याला दोन वर्षांसाठी हद्दपार करण्यात आले आहे.

ही कारवाई मा. पोलीस अधीक्षक अर्चित चांडक . अपर पोलीस अधीक्षक चंद्रकांत रेड्डी, उपविभागीय पोलीस अधिकारी वैशाली मुळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. पोलीस निरीक्षक धर्मेंद्र जोशी यांच्या नेतृत्वाखाली मूर्तिजापूर शहर पोलिसांनी ही कारवाई प्रभावीपणे राबविली.

# टिळक राष्ट्रीय सरस्वती मंदिर प्राथमिक शाळा परिसरात वृक्षारोपण

प्रतिनिधी १० ऑगस्ट

**अकोला :** ऑगस्ट क्रांती दिनानिमित्त टिळक राष्ट्रीय सरस्वती मंदिर प्राथमिक शाळेतील विद्यार्थी व माजी विद्यार्थी संघातील सदस्यांच्या उपस्थितीत शाळा परिसरात विविध जातीचे वृक्षारोपण करण्यात आले. मानवी जीवनात झाडांचे महत्व याविषयी थोटे यांनी आपले विचार व्यक्त केले. मुलांना झाडांचे संगोपन करण्याविषयी मार्गदर्शन केले.

यावेळेस प्रमुख उपस्थिती म्हणून विद्यार्थी संघाचे उमेश मसने,मुख्याध्यापक दत्ता कोल्हे, संजय पळसपगार , प्रकाश मालगन, शरद इंगोले, सुनील भातुलकर, प्रथमेश लोखंडे तर उपस्थिती म्हणून शाळेच्या शिक्षिका साधना देशमुख, शुभांगी मुरुमकार, सारिका काळे उपस्थित होते. शाळेच्या वतीने यावेळेस मुख्याध्यापक दत्ता फुले यांनी आपले मत व्यक्त करताना माजी विद्यार्थी विविध उपक्रम राबवीत असल्यामुळे शाळेला संजीवनी मिळाली माजी विद्यार्थ्यांचे आभार मानले.



# अडगाव व्हॉल्व्ह दुरुस्ती व जलशुद्धीकरण केंद्र स्वच्छतेसाठी पाणीपुरवठा दोन दिवस बंद

**अकोट :** महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, उपविभाग अकोट यांच्या वतीने अडगाव येथील पाणीपुरवठा योजनेतील व्हॉल्व्ह दुरुस्ती तसेच अकोट शहर जलशुद्धीकरण केंद्राची स्वच्छता करण्यात येणार असल्याने अकोट शहरासह अकोट 84 खेडी प्रादेशिक पाणीपुरवठा योजना, हिवरखेड, अडगाव व तेल्हारा शहराचा पाणीपुरवठा दि. 11 व 12 ऑगस्ट 2026 रोजी बंद राहणार आहे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे उपविभागीय अभियंता (प्र.) एन. के. राऊत यांनी दिलेल्या माहितीनुसार, आवश्यक दुरुस्ती व स्वच्छता कामे तातडीने पूर्ण करण्यात येणार असून शक्य असल्यास एकाच दिवसात काम पूर्ण करून पाणीपुरवठा पूर्ववत सुरू करण्याचा प्रयत्न केला जाईल. दरम्यान, संबंधित भागातील नागरिकांनी पाण्याचा आवश्यक साठा करून सहकार्य करावे, असे आवाहन महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने केले आहे. जनहितार्थ ही माहिती प्रसिद्ध करण्यात आली आहे.

# आरोग्य केंद्रालगतच्या बगीच्यात अस्वच्छतेचा विळखा

**अकोट :** अकोट शहरातील नंदीपेठ येथील आरोग्य केंद्र व त्यालगत असलेल्या बगीच्यात मोठ्या प्रमाणात अस्वच्छता पसरली असून, वाढलेले गवत, झाडाझुडपे आणि कचऱ्यामुळे या परिसरात सापांचा वावर वाढल्याचे दिसून येत आहे. नुकताच साप आढळल्याचा व्हिडिओ समोर आल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

आरोग्य केंद्रात दररोज नागरिक तसेच रुग्णांची ये-जा असते.अशा ठिकाणीच स्वच्छतेचा अभाव असल्याने नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. बगीच्यातील वाढलेले गवत व झाडाझुडपे यामुळे सरपटणाऱ्या प्राण्यांना लपण्यासाठी पोषक वातावरण निर्माण झाले आहे. आरोग्य केंद्राच्या परिसरात नियमित स्वच्छता करणे तसेच बगीच्यातील वाढलेले गवत व झाडाझुडपे हटविणे आवश्यक असताना प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष होत असल्याची नागरिकांची भावना आहे.

# आलेगावात दारु-मटक्याचा 'डबल गेम'

## चान्नी पोलिसांसह स्थानिक गुन्हे शाखेच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह!

प्रतिनिधी १० ऑगस्ट

**पातूर :** चान्नी पोलीस स्टेशनच्या हद्दीतील आलेगाव चौकी परिसरात कथित अवैध देशी-विदेशी दारू विक्रीसोबतच वरली-मटका व्यवसायही सुरू असल्याच्या चर्चेने परिसरात खळबळ उडाली आहे. एकीकडे दारूचा कथित ठोक पुरवठा सुरू असल्याच्या चर्चा, तर दुसरीकडे वरली-मटक्याचे जाळे सक्रिय असल्याचे बोलले जात असल्याने स्थानिक चान्नी पोलिसांच्या कार्यपद्धतीसह स्थानिक गुन्हे शाखेच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

आलेगाव परिसरात 'पवन मंगेश' नावाच्या व्यक्तीचा देशी-विदेशी दारूच्या कथित ठोक विक्रीशी संबंध असल्याची चर्चा नागरिकांमध्ये आहे. त्याच्याकडून परिसरातील विविध ठिकाणी दारूचा पुरवठा केला जात असल्याचे आरोप केले जात आहेत. दुसरीकडे, आलेगाव परिसरात 'बंडू' नावाच्या व्यक्तीमार्फत वरली-मटका चालविला जात असल्याची, तर ग्रामीण भागात 'महाजन' नावाने ओळखल्या जाणाऱ्या व्यक्तीचा या व्यवसायाशी संबंध असल्याची चर्चा आहे.




मात्र, प्रश्न केवळ चर्चेपुरता मर्यादित राहत नाही. जर हे अवैध व्यवसाय प्रत्यक्षात सुरू असतील, तर स्थानिक पोलिसांना त्याची माहिती का मिळत नाही? आणि माहिती असेल तर कारवाई कुठे आहे? असा थेट सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

**जमादारांच्या कार्यक्षेत्रात एवढे धाडस कसे? :** आलेगाव चौकी परिसरातील कथित अवैध व्यवसायांबाबत स्थानिक पातळीवर चर्चा होत असताना जमादार वाघ यांच्या कार्यक्षेत्रात हे प्रकार सुरू असल्याचे आरोप गंभीर मानले जात आहेत. हे प्रकार पोलिसांच्या निदर्शनास आले नाहीत की त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष झाले, याची वरिष्ठ अधिकाऱ्यांनी चौकशी करण्याची मागणी होत आहे. दारू व मटक्यामुळे अनेक कुटुंबांवर आर्थिक आणि सामाजिक संकट ओढवू शकते. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाकडे केवळ नियमित पोलिस कारवाई म्हणून न पाहता अवैध व्यवसायाचे संपूर्ण नेटवर्क शोधण्याची गरज व्यक्त होत आहे.

**'आशीर्वाद' कोणाचा? चौकशीची मागणी :** आलेगाव परिसरातील कथित दारू विक्री आणि वरली-मटका व्यवसायाबाबत होत असलेल्या चर्चांमुळे 'या धंद्यांना कोणाचा वरदहस्त आहे?' हा प्रश्न आता चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे. स्थानिक चान्नी पोलीस स्टेशन आणि स्थानिक गुन्हे शाखेने या प्रकरणाची स्वतःहून दखल घेतली नाही, तर वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी स्वतंत्र पथकामार्फत चौकशी करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. दारू-मटका व्यवसायाच्या या कथित जाळ्याची पाळेमुळे कुठपर्यंत आहेत? त्यामागे नेमके कोण? स्थानिक पातळीवर कोणाचे संरक्षण आहे का? आणि कारवाई होत नसेल तर त्याला जबाबदार कोण? या प्रश्नांची उत्तरे आता पोलिस प्रशासनाने देण्याची वेळ आली आहे.

### गुन्हे शाखेची 'गुप्त' माहिती कुठे हरवली?

अवैध दारू, वरली-मटका यांसारख्या व्यवसायांवर कारवाई करण्यासाठी स्थानिक पोलिसांसोबतच स्थानिक गुन्हे शाखेची भूमिका महत्त्वाची मानली जाते. मात्र, आलेगाव व परिसरात अशा प्रकारच्या व्यवसायांच्या चर्चा सातत्याने होत असतील, तर स्थानिक गुन्हे शाखेचे माहिती संकलन यंत्रणा नेमकी काय करत आहे? असा प्रश्न उपस्थित होत आहे. अवैध व्यवसाय करणाऱ्यांवर कारवाई करण्याऐवजी केवळ किरकोळ विक्रेत्यांवर कारवाई करून प्रकरण संपविले जाते का? मूळ पुरवठादार, कथित ठोक विक्रेते, एजंट आणि आर्थिक व्यवहार करणाऱ्यांपर्यंत तपास कधी पोहोचणार? असा सवालही नागरिक विचारत आहेत.

## निधन वार्ता

**सयाबाई सिरसाट**



**हिवरखेड :** बारगण पुऱ्यातील रहिवाशी सुरेश सिरसाट यांच्या मातोश्री सयाबाई इंद्रभान सिरसाट यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात मोठा आप्त परिवार आहे.

# सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ

सोमवार, दि. १० ऑगस्ट २०२६

https://epaper.citynewssuperfast.com


## फुलसावंगीत मुख्य मार्गावर पथदिवे बंद

प्रतिनिधी १० ऑगस्ट

**फुलसावंगी** : ग्रामपंचायत प्रशासनाच्या दुर्लक्षित धोरणामुळे मुख्य मार्गावरील पथदिवे बंद आहेत. त्यामुळे नागरिकांना अंधाराचा सामना करावा लागत आहे.

वारंवार तक्रारी करूनही प्रशासन उपाययोजना करीत नसल्याने नागरिकांत नाराजी आहे. प्रभाग क्रमांक १ मधील श्रीराम मंदिर, पिंपळेश्वर मंदिर, कब्रस्थानकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यावरील विद्युत

खांबावर लाईट नसल्याने रात्रीला अंधार राहतो. लवकरच श्रावण महिना सुरू होत असून भाविकांची मंदिरात व प्रार्थनास्थळी जाण्यासाठी ये-जा सुरू असते.

ऐन सणासुदीच्या काळात नागरिकांना अंधारातून रस्ता शोधण्याची वेळ येणार आहे.

या समस्येकडे लक्ष वेधण्यासाठी शेख अनिस शेख अजीज यांनी ग्रामपंचायत प्रशासनाला निवेदन दिले. दखल न घेतल्यास १३ ऑगस्टपासून उपोषणाचा इशारा दिला आहे.

# पडक्या घरातून थेट 'असिस्टंट कमांडंट' पदावर

### हेमंत भुजाडेच्या जिद्दीला सलाम ; UPSC-CAPF भरारी!

प्रतिनिधी १० ऑगस्ट

राहुल वासनिक

**यवतमाळ** : घरची परिस्थिती हलाखीची... वडील अपंग, आई रोजंदारी करून कुटुंबाचा गाडा ओढणारी... शिक्षणाचा खर्च भागवण्यासाठी बालवयात वृत्तपत्रे वाटण्याचे काम... पुढे पुण्यात जाऊन स्पर्धा परीक्षेची तयारी करताना जिम ट्रेनर म्हणून नोकरी... आणि याच काळात वडील व बहिणीच्या निधनाचा धक्का! मात्र या संकटांसमोर न झुकता जिद्द, मेहनत आणि आत्मविश्वासाच्या जोरावर मारेगावच्या हेमंत शंकर भुजाडे यांनी UPSC-CAPF परीक्षेत यश संपादन करत असिस्टंट कमांडंट (AC) पदावर निवड मिळवली आहे. त्यांच्या या यशामुळे मारेगावच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे.

हेमंत भुजाडे यांचे बालपण मारेगावातील प्रभाग क्रमांक ७ मध्ये अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत गेले. घरची आर्थिक परिस्थिती बेताची असल्याने शिक्षणासाठीही संघर्ष करावा लागला. वडील अपंग असल्याने कुटुंबाची जबाबदारी आईवर होती. आई रोजंदारी करून संसाराचा गाडा चालवत होती. परिस्थितीची जाणीव असल्याने हेमंत यांनी लहान वयातच वृत्तपत्रे वाटण्याचे काम सुरू केले.

■ **मारेगावच्या शाळेतून पुण्यापर्यंतचा प्रवास**

मारेगाव येथील जिल्हा परिषद शाळेतून माध्यमिक शिक्षण पूर्ण केल्यानंतर हेमंत यांनी उच्च शिक्षणासाठी पुण्याची वाट धरली. पुण्यात राहून केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेची तयारी सुरू केली. मात्र स्पर्धा परीक्षेच्या तयारीसोबतच स्वतःचा खर्च भागविण्याचे आव्हानही त्यांच्यासमोर होते. त्यामुळे त्यांनी जिम ट्रेनर म्हणून काम करत अभ्यास सुरू ठेवला.

एकीकडे नोकरी आणि दुसरीकडे स्पर्धा परीक्षेचा अभ्यास, अशा दुहेरी जबाबदारीतून त्यांचा संघर्ष सुरू राहिला. आर्थिक अडचणी, साधनांची कमतरता आणि ग्रामीण पार्श्वभूमी यापैकी कोणतीही गोष्ट त्यांनी आपल्या ध्येयाच्या आड येऊ दिली नाही.

वडील आणि बहिणीच्या निधनाचा मोठा आघात

UPSC परीक्षेची तयारी सुरू असतानाच हेमंत यांच्या वडिलांचे आणि बहिणीचे निधन झाले. आयुष्यातील दोन मोठे आधार हरपल्याने त्यांच्यावर दुःखाचा डोंगर कोसळला. मात्र या आघातातूनही त्यांनी स्वतःला सावरले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांनी प्रेरणा घेत संकटांशी दोन हात करण्याचा निर्धार त्यांनी कायम ठेवला.

या कठीण काळात पुण्यातील मित्र तसेच मारेगावच्या 'इलेव्हन स्टार क्रिकेट क्लब'मधील सहकाऱ्यांनी त्यांना मानसिक आधार दिला.






त्यांच्या प्रोत्साहनामुळे हेमंत यांनी अभ्यासातील सातत्य कायम ठेवले.

संघर्षाचे रूपांतर यशात

अनेक वर्षांच्या अथक परिश्रमाला अखेर यश आले. UPSC-CAPF परीक्षेत निवड होत हेमंत भुजाडे यांनी असिस्टंट कमांडंट हे प्रतिष्ठेचे पद मिळवले. एका संघर्षमय कुटुंबातून आलेल्या तरुणाने केंद्रीय सुरक्षा दलातील अधिकारीपदापर्यंत मजल मारल्याने मारेगाव परिसरात आनंदाचे वातावरण आहे.

हेमंत यांचे यश केवळ एका कुटुंबाचे किंवा गावाचे यश नसून, प्रतिकूल परिस्थितीतून मार्ग काढत स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या ग्रामीण भागातील हजारो विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरले आहे.

"परिस्थितीला दोष देत बसण्यापेक्षा ती बदलण्यासाठी मेहनत करा. साधनांची कमतरता तुमचे भवितव्य ठरवत नाही; जिद्द, सातत्य आणि कठोर परिश्रम तुमचे भविष्य घडवू शकतात," असा संदेश हेमंत भुजाडे यांनी आपल्या यशातून विद्यार्थ्यांना दिला आहे.

पडक्या घरातून सुरू झालेला संघर्ष आता देशसेवेच्या 'असिस्टंट कमांडंट' पदापर्यंत पोहोचला आहे. त्यामुळे हेमंत भुजाडे यांची ही भरारी 'परिस्थितीवर मात करणाऱ्या जिद्दीची कहाणी' ठरली आहे.

# पालकमंत्री राठोड आदिवासी नृत्यावर थिरकले!

### निसर्गपुत्रांच्या अंगणात विकासाची नवी पहाट : कोलाम पोडावर साजरा केला जागतिक आदिवासी दिन

प्रतिनिधी १० ऑगस्ट

**यवतमाळ** : जल, जंगल आणि जमिनीशी नाळ जोडलेली संस्कृती, निसर्गाला दैवत मानणारा भाव आणि प्रतिकूल परिस्थितीतही जपलेला स्वाभिमान... अशा आदिवासी संस्कृतीचा गौरव करणाऱ्या जागतिक आदिवासी दिनानिमित्त पालकमंत्री संजय राठोड यांनी रविवारी बाभुळगाव तालुक्यातील पिंपरी ईजारा येथील इंदिरानगर कोलाम पोडावर जाऊन आदिवासी बांधवांसोबत संपूर्ण दिवस घालवला. शासकीय प्रोटोकॉल बाजूला ठेवत त्यांनी ग्रामस्थांसोबत जमिनीवर बसून संवाद साधला आणि त्यांच्या समस्या जाणून घेतल्या.





गावात पोहोचताच मोरपिसांचा पारंपरिक टोप परिधान करून पालकमंत्र्यांनी आदिवासी बांधवांसोबत ढोलाच्या तालावर फेर धरला. यावेळी पालकमंत्री स्वतः आदिवासी नृत्यावर थिरकल्याने उपस्थितांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. पोडावरील चावडीत आदिवासी दैवतांचे दर्शन घेत त्यांनी भगवान बिरसा मुंडा, क्रांतिवीर शामादादा कोलाम, राणी दुर्गावती आणि वीर बापुराव शेडमाके यांच्या प्रतिमांना अभिवादन केले.

'कोलामी बोलीचा अभिमान बाळगा; मात्र आधुनिक जगाशी स्पर्धा करण्यासाठी मराठी आणि इंग्रजी भाषेवरही प्रभुत्व मिळवा,' असे आवाहन राठोड यांनी तरुणांना केले. जल, जंगल आणि जमिनीवर आधारित आदिवासी जीवनशैली व निसर्गपूजक परंपरा या मानवी संस्कृतीच्या मुळाशी असल्याचेही त्यांनी सांगितले.

पालकमंत्री राठोड यांनी चावडीवर ग्रामस्थांसोबत खाली बसून त्यांच्या समस्या ऐकून घेतल्या. कोलाम समाजाच्या सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक विकासासाठी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून स्वतंत्र निधीची तरतूद करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

गावातील प्रलंबित प्रश्नांवर केवळ आश्वासने न देता त्यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना तत्काळ कार्यवाहीचे निर्देश दिले. सुसज्ज अभ्यासिका, वाचनालय, विद्यार्थ्यांसाठी थेट बससेवा, उच्च शिक्षण व परदेशी शिक्षणासाठी विशेष शिष्यवृत्ती, स्वच्छ पिण्याच्या पाण्यासाठी जलशुद्धीकरण यंत्रे, सामाजिक सभागृह, सांस्कृतिक भवन आणि स्मशानभूमी उभारणीचे प्रस्ताव तातडीने मंजूर करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. महिला बचत गट आणि ग्रामसंघांना आर्थिक मदत देऊन स्थानिक पातळीवर उद्योग-व्यवसायाला चालना देण्याची ग्वाहीही त्यांनी दिली. आदिवासी पोडावरील समस्यांचा सातत्याने पाठपुरावा करण्यासाठी विशेष स्वीय सहायकाची नियुक्ती करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

पोड्यावर पोहोचल्यानंतर प्रत्येक घरासमोर पालकमंत्र्यांचे ओवाळून स्वागत करण्यात आले. काही ज्येष्ठ महिलांनी पाय धुऊन त्यांचे स्वागत केले. त्यानंतर पालकमंत्री राठोड यांनीही या महिलांचे पाय धुऊन त्यांना मातृवंदन केले. या भावनिक प्रसंगाने उपस्थित महिला भारावून गेल्या.

दरम्यान, गावातील कौशल महादेव अंजिकर या वृद्ध महिलेने पारंपरिक आदिवासी नृत्याचा फेर धरला. त्यांनी पालकमंत्र्यांनाही नृत्यात सहभागी होण्याची विनंती केली. त्यानंतर राठोड यांनीही ढोलाच्या तालावर आदिवासी बांधवांसोबत नृत्य केले.

**काळा चहा, झुणका-भाकरी अन् सामाजिक ऐक्य** : आदिवासी संस्कृतीतील पाहुणचाराची परंपरा जपत ग्रामस्थांनी पालकमंत्र्यांचे काळ्या चहाने स्वागत केले. राठोड यांनीही चावडीवर सर्वांसोबत काळ्या चहाचा आस्वाद घेतला. त्यानंतर ग्रामस्थ आणि अधिकाऱ्यांसोबत जमिनीवर बसून झुणका-भाकरीचे स्नेहभोजन केले. कार्यक्रमात गुणवंत विद्यार्थी व पालकांचा सत्कार करण्यात आला. महिला भजनी मंडळाला भजन साहित्याचे वाटप, तर स्थानिक तरुण खेळाडूंना क्रिकेट किट देऊन त्यांच्या कौशल्याला प्रोत्साहन देण्यात आले.

सत्तेतील व्यक्तीने वंचितांच्या उंबरठ्यावर जाऊन त्यांच्या सुख-दुःखात सहभागी होणे, संवाद साधणे आणि समस्यांच्या सोडवणुकीसाठी प्रशासनाला थेट निर्देश देणे, हा सामाजिक ऐक्याचा आणि समावेशक विकासाचा संदेश ठरला.

कार्यक्रमास तहसीलदार मीरा पागोरे, शिवसेना पश्चिम विदर्भ सहसंपर्कप्रमुख पराग पिंगळे, जिल्हा संपर्कप्रमुख हरिहर लिंगनवार, जिल्हाप्रमुख राजुदास जाधव, गजानन डोमाळे, यशवंत पवार, समन्वयक संजय हातगावकर, युवासेना जिल्हाप्रमुख प्रद्युम्न जवळकर, आकाश राठोड, संजय रंगे, सचिन महल्ले, नितीन पखाले, लोकेश इंगोले, दर्शना इंगोले यांच्यासह विविध पदाधिकारी, ग्रामस्थ, महिला, युवक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रास्ताविक संदिप गाडे यांनी केले, तर संचालन सुरेश चिंचोळकर यांनी केले.

# बांधकाम विभागाचे कार्यालयच दुरुस्तीच्या विळख्यात!

### आठ महिन्यांपासून काम सुरू; प्लास्टर पुन्हा गळाले

प्रतिनिधी १० ऑगस्ट

**यवतमाळ** : जिल्हा परिषद बांधकाम विभाग क्रमांक दोनच्या दारव्हा येथील कार्यालयाची दुरवस्था पुन्हा चव्हाट्यावर आली आहे. दुरुस्तीचे काम नुकतेच पूर्ण झाल्याचा दावा करण्यात आला असतानाच कार्यालयातील भिंतींचे प्लास्टर मोठ्या प्रमाणात गळून पडले आहे. त्यातच वीज जोडणी व विद्युत पुरवठ्याचे काम अद्याप सुरू असल्याने गेल्या आठ महिन्यांपासून हे कार्यालय बांधकाम व दुरुस्तीच्या कामातच अडकले आहे.

या कार्यालयातील अनेक ठिकाणी प्लास्टर निघून विटा उघड्या पडल्या आहेत. दुरुस्तीच्या कामामुळे कार्यालयीन कामकाजावरही परिणाम



होत असल्याचे चित्र आहे. अधिकारी व कर्मचाऱ्यांना अशा परिस्थितीत काम करावे लागत असल्याने नागरिकांची कामे वेळेत कशी होणार, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

बहुजन मुक्ती पार्टीचे लोकसभा अध्यक्ष (यवतमाळ-वाशीम) बिमोद मुधाने यांनी या प्रकाराबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली. "बांधकाम विभागाच्या स्वतःच्या कार्यालयालाच वारंवार दुरुस्तीची वेळ येत असेल, तर इतर शासकीय इमारतींच्या कामाच्या गुणवत्तेवर विश्वास कसा ठेवायचा? आठ महिन्यांपासून कार्यालयाचे काम सुरू आहे. एक काम पूर्ण होण्यापूर्वी दुसरे काम सुरू होत आहे," असा आरोप त्यांनी केला.

दारव्हा येथील बांधकाम विभागाकडे वरिष्ठ अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष असल्याचा आरोपही मुधाने यांनी केला. निकृष्ट कामे, वारंवार दुरुस्ती आणि शासनाच्या निधीच्या संभाव्य अपव्ययाची चौकशी करण्याची मागणी त्यांनी केली.

**चौकशी करून कारवाईची मागणी**

■ कार्यालयाच्या दुरुस्तीच्या कामाची उच्चस्तरीय चौकशी करून संबंधित कंत्राटदार, अभियंते व जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी मुधाने यांनी केली. कार्यालय तातडीने सुरक्षित व सुस्थितीत न केल्यास बहुजन मुक्ती पार्टीच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.

# शिक्षण परिषदेत गुणवत्तावाढीसाठी शिक्षकांचे चिंतन

### नावीन्यपूर्ण अध्यापन, तंत्रज्ञानाचा सकारात्मक वापर अन् विद्यार्थीकेंद्री शिक्षणावर भर

प्रतिनिधी १० ऑगस्ट

**उमरखेड** : तालुक्यातील आयएसओ मानांकित जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, नागापूर येथे शैक्षणिक सत्र २०२६-२७ मधील समूह साधन केंद्र कुपटीची पहिली शिक्षण परिषद उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. गुणवत्तापूर्ण शिक्षण, नावीन्यपूर्ण अध्यापन, विद्यार्थीकेंद्री शिक्षण आणि शिक्षकांच्या अनुभवांची देवाणघेवाण या विषयांवर परिषदेत विचारमंथन करण्यात आले.

शिक्षण समितीचे जिल्हा परिषद सदस्य चिंतांगराव कदम यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या परिषदेला गटशिक्षणाधिकारी विजय बेटेवाड यांनी मार्गदर्शन केले. समूह साधन केंद्रप्रमुख डॉ. दीपक ढोक यांनी परिषदेचे आयोजन केले.

चिंतांगराव कदम यांनी बदलत्या शैक्षणिक प्रवाहानुसार शिक्षकांनी स्वतःला अद्ययावत ठेवण्याची गरज व्यक्त केली. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने प्रयत्न करण्याचे आवाहन त्यांनी केले. "गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी शिक्षकांचे सातत्यपूर्ण चिंतन, नावीन्यपूर्ण प्रयत्न आणि सामूहिक सहभाग हीच शिक्षण परिषदेची खरी ताकद आहे," असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाची सुरुवात शालेय परिपाठाने झाली. इयत्ता सहावीच्या विद्यार्थिनींनी आकर्षक व शिस्तबद्ध परिपाठ सादर करून उपस्थितांचे लक्ष वेधले. त्यामुळे शालेय परिसरात उत्साही शैक्षणिक वातावरण निर्माण झाले. समूह साधन केंद्रप्रमुख डॉ. दीपक ढोक यांनी प्रास्ताविकातून शिक्षण परिषदेची उद्दिष्टे, शिक्षकांची शैक्षणिक भूमिका आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी आवश्यक बाबींवर मार्गदर्शन केले. गटशिक्षणाधिकारी विजय बेटेवाड यांनी प्रभावी अध्यापन, सातत्यपूर्ण प्रयत्न, तंत्रज्ञानाचा सकारात्मक वापर आणि विद्यार्थ्यांच्या गरजेनुसार अध्यापन करण्याचे आवाहन केले.

परिषदेत शिक्षकांच्या दैनंदिन अध्यापनातील अनुभव, नावीन्यपूर्ण उपक्रम, विद्यार्थीकेंद्री शिक्षण, डिजिटल साधनांचा प्रभावी वापर तसेच शाळेची सर्वांगीण गुणवत्ता वाढविण्यासाठी राबविता येणाऱ्या विविध उपक्रमांवर चर्चा झाली. त्यामुळे ही परिषद केवळ औपचारिक न राहता शिक्षकांच्या शैक्षणिक चिंतनाला आणि अनुभवांच्या देवाणघेवाणीला विचारपीठ ठरली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुख्याध्यापक सतीश घोडके यांनी केले, तर कुपटी येथील सहायक शिक्षक किशोर कदम यांनी आभार मानले. परिषद यशस्वी करण्यासाठी कैलास गारोळे, संदीप कवडे, छाया चाकोरे, उज्वला कलाने, पद्मावती लोमटे, नानासाहेब कदम व वच्छला राठोड यांनी परिश्रम घेतले.

# "विद्यार्थ्यांच्या बसला ताडपत्रीचा 'आधार'; मानवविकास मिशनच्या सेवेलाच गळती"

### परिवहनमंत्र्यांच्या सूचनांना यवतमाळ विभागात केराची टोपली?

प्रतिनिधी १० ऑगस्ट

**यवतमाळ** : ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी मानवविकास मिशनअंतर्गत सुरू करण्यात आलेल्या बससेवेची दुरवस्था यवतमाळ विभागात समोर आली आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षित प्रवासासाठी असलेल्या बसच्या छतालाच ताडपत्रीचा आधार देण्यात आला असून, पावसाळ्यात विद्यार्थ्यांना गळतीच्या पाण्यातून प्रवास करावा लागत असल्याचे चित्र आहे. त्यामुळे 'मानवविकास'च्या बसमधून विद्यार्थ्यांचा विकासाऐवजी गैरसोयींचाच प्रवास सुरू असल्याची चर्चा आहे.



मानवविकास मिशनअंतर्गत ग्रामीण भागातील विद्यार्थी दररोज शाळा-महाविद्यालयात ये-जा करतात. त्यांच्यासाठी ही बससेवा शिक्षणाची महत्त्वाची कडी मानली जाते.

मात्र बसच्या छताला ताडपत्री लावून पावसापासून बचाव करण्याचा तात्पुरता उपाय करण्यात आला आहे. पावसाचा जोर वाढल्यानंतर बसमध्ये पाणी गळत असल्याने विद्यार्थ्यांना आसनांवरून उठून पाण्यापासून बचाव करण्याची कसरत करावी लागत असल्याचे सांगण्यात येते.

विशेष म्हणजे, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी ताडपत्री लावलेल्या बस रस्त्यावर उतरवू नयेत, अशा स्पष्ट सूचना दिल्याचे सांगितले जाते. असे असतानाही यवतमाळ विभागात ताडपत्री लावलेल्या बस धावत असल्याने मंत्र्यांच्या सूचनांची अंमलबजावणी नेमकी कुठे थांबली, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

**मंत्र्यांच्या आदेशाला 'ताडपत्री'चे आवरण?**

■ बसची तात्पुरती डागडुजी करून प्रश्न मिटविण्याऐवजी कायमस्वरूपी दुरुस्ती करणे अपेक्षित असताना ताडपत्री लावून बस रस्त्यावर धावू देण्यात येत असल्याचा आरोप पालकांकडून होत आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेशी निगडित बाब असल्याने मानवविकास मिशनच्या सर्व बसची तातडीने तपासणी करावी, अशी मागणी होत आहे. ताडपत्री हा पावसापासून बचावाचा कायमस्वरूपी उपाय होऊ शकत नाही. त्यामुळे बसच्या छताची गळती दुरुस्त करून विद्यार्थ्यांना सुरक्षित आणि आरामदायी प्रवासाची सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशी अपेक्षा पालक व विद्यार्थ्यांकडून व्यक्त होत आहे.

**सूचनांची अंमलबजावणी कोण करणार?**

■ परिवहन मंत्र्यांनी ताडपत्री लावलेल्या बस रस्त्यावर न उतरविण्याच्या सूचना दिल्या असतील, तर त्या सूचनांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी संबंधित विभागाची आहे. यवतमाळ विभागात प्रत्यक्षात ताडपत्री लावलेल्या बस धावत असल्याने संबंधित अधिकाऱ्यांनी याची दखल घेऊन तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी होत आहे.

# 'निवृत्ती हा शेवट नव्हे, समाजसेवेच्या नव्या पर्वाची सुरुवात'

### कार्यकारी संचालक राजू काटपिल्लेवार यांचा सेवापूर्ती निमित्त सत्कार

प्रतिनिधी १० ऑगस्ट

**आर्णी** : महाराष्ट्र शासनाच्या पाटबंधारे विभागाच्या कोकण विभागाचे कार्यकारी संचालक म्हणून प्रदीर्घ व उल्लेखनीय सेवा बजावून सेवानिवृत्त झालेल्या राजू काटपिल्लेवार यांचा सेवापूर्ती निमित्त गुड मॉर्निंग ग्रुप, आर्णीच्या वतीने विशेष सत्कार करण्यात आला. आर्णीचे भूमिपुत्र म्हणून असलेले त्यांचे नाते आणि शहराशी असलेली घट्ट नाळ लक्षात घेता या सत्काराला विशेष महत्त्व प्राप्त झाले.

काटपिल्लेवार यांनी शासकीय सेवेत विविध जबाबदाऱ्या समर्थपणे पार पाडत प्रशासकीय कार्याचा ठसा उमटविला. त्यांच्या प्रशासकीय कार्यासोबतच सामाजिक बांधिलकीची दखल घेत गुड मॉर्निंग ग्रुपच्या वतीने त्यांचा गौरव करण्यात आला. उपस्थितांनी त्यांच्या सेवाभावी वृत्तीचे आणि कर्तृत्वाचे कौतुक केले.



सत्काराला उत्तर देताना राजूभाऊ काटपिल्लेवार यांनी गुड मॉर्निंग ग्रुपचे आभार मानले. "शासकीय सेवेतून निवृत्ती म्हणजे प्रवासाचा शेवट नव्हे, तर समाजसेवेच्या नव्या पर्वाची सुरुवात आहे," असे सांगत उर्वरित आयुष्य आर्णीकरांच्या सेवेसाठी आणि सामाजिक कार्यासाठी समर्पित करण्याचा मनोदय त्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व संचालन नगरसेवक तथा आर्णी नगरपरिषदेचे गटनेते आणि गुड मॉर्निंग ग्रुपचे सदस्य अमोल मांगुळकर यांनी केले.

यावेळी चोरडिया, अनिस बेग, प्रवीण निलावार, रणजीत राणा, गुड मॉर्निंग ग्रुपचे अध्यक्ष राजू वाडेकर, अनिल पद्मावत यांच्यासह ग्रुपच्या नव्या सत्रातील दीपक वानखेडे, अनिल खंडारे, अक्रम गौरी, नरूभाऊ खत्री, अभिनंदन हिन्डोचा, प्रमोद निलावार, किशोर बोरगावकर, सुरेंद्र गावंडे, प्रवीण विंचुरकर, अनिल सुकले, उमेश राठोड, प्रीतम जोशी, राहुल निलावार, नसीर राजकोटिया, विक्रम पोतगुले, संजय काटपिल्लेवार, रणजीत राठोड, संजय ठाकरे, विनोद मांडोले, विवेक कोठारी, राहुल माहुरे, शशिकांत झळके, विनोद सोयाम, कमलेश आस्वार, गजू मोरलेवार, संजू आडे, अमोल तायडे, बालू पिल्लेवार, राजू पतंगे, शैलेश धोपे, विशाल माहेश्वरी, रणजीत काटे, अतुल देशमुख, अनिस बेग, अमन बेग, श्रीकांत गीते, नितेश पाटील, बुटले मनोज, राजू जयस्वाल, विठ्ठल राऊत, आदित्य लोणसने आदी सदस्य उपस्थित होते.

# दर्यापुरातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ स्मारकासाठी अंतिम मंजुरी द्या

## बच्चू कडू यांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने निवेदन

प्रतिनिधी १० ऑगस्ट

**दर्यापूर:** दर्यापूर शहरातील सर्वे क्रमांक १०७ येथील प्रस्तावित छत्रपती शिवाजी महाराजांच्या भव्य अश्वारूढ (एक्वेस्ट्रियन) स्मारकासाठी महाराष्ट्र शासनाकडून अंतिम प्रशासकीय मंजुरी मिळावी, या मागणीचे निवेदन आज महाराष्ट्र विधान परिषदेचे सदस्य बच्चू उर्फ ओमप्रकाश कडू यांना नगर परिषद, दर्यापूर येथे भेटीदरम्यान देण्यात आले.



या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, सदर जागा विकास आराखड्यात "शॉपिंग कॉम्प्लेक्स" या प्रयोजनासाठी आरक्षित असल्याने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३७(१) अन्वये आरक्षणात बदल करण्याची आवश्यक प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करण्यात आली असून प्रस्ताव सध्या नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई येथे अंतिम मंजुरीसाठी विचाराधीन आहे.

दर्यापूर शहरातील शिवप्रेमी नागरिकांची अनेक वर्षांपासूनची मागणी लक्षात घेऊन या प्रस्तावास तातडीने मंजुरी मिळण्यासाठी आपल्या स्तरावर नगर विकास विभागाकडे पाठपुरावा करावा, अशी विनंती निवेदनातून करण्यात आली. या विषयासाठी मा. आमदार संजय खोडके साहेब यांच्यामार्फत सातत्याने पाठपुरावा सुरू असल्याचाही उल्लेख करण्यात आला.

यावेळी अमोल गहरवार यांनी मा. आमदार बच्चू कडू यांना निवेदन सादर केले. दर्यापूर शहराच्या अस्मितेशी निगडित असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या भव्य अश्वारूढ स्मारकास लवकरात लवकर अंतिम मंजुरी मिळावी, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली. यावेळी उपस्थित तालुका अध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी निलेश पाटील मोपारी नगरसेवक राहुल बेताळे जिल्हा उपाध्यक्ष युवक शुभम होले शहर संघटक योगेश पाटील हिंगणकर पदाधिकारी उपस्थित होते.

# शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना दिलासा रजा रोखीकरणाबाबत शासन निर्णय जाहीर

प्रतिनिधी १० ऑगस्ट

**अमरावती :** महाराष्ट्रातील महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी महत्त्वपूर्ण दिलासा देणारा निर्णय राज्य शासनाने जाहीर केला आहे. सातव्या वेतन आयोगानुसार रजा रोखीकरण लागू करण्याबाबत उच्च व तंत्र शिक्षण विभागाने शासन निर्णय निर्गमित केला आहे.

अशासकीय महाविद्यालय शिक्षकेतर कर्मचारी संघ, मुंबई तसेच महाराष्ट्र राज्य महाविद्यालय शिक्षकेतर कर्मचारी महासंघ (कल्याण) यांच्या पाठपुराव्यामुळे हा निर्णय शक्य झाला आहे. कोकण पदवीधर मतदारसंघाचे आमदार ॲड. निरंजन वसंतराव डावखरे यांच्या विशेष प्रयत्नांमुळे मंगळवारी ४ ऑगस्ट मंत्रालयात उच्च व तंत्र शिक्षण मंत्री मा. ना.चंद्रकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली होती.

या बैठकीत शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांवर चर्चा झाली. त्यामध्ये रजा रोखीकरणाचा मुद्दा क्रमांक ३ विशेषत्वाने मांडण्यात आला होता.

संबंधित मागणीवर सकारात्मक भूमिका घेत मंत्री महोदयांनी अधिकाऱ्यांना तत्काळ निर्णय घेण्याचे निर्देश दिले होते.

त्या अनुषंगाने ६ ऑगस्ट रोजी शासन निर्णय जारी करण्यात आला असून, त्यामुळे राज्यातील हजारो शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

या निर्णयाबद्दल शिक्षकेतर कर्मचारी संघटनांनी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री ना. चंद्रकांत पाटील, आमदार ॲड. निरंजन वसंतराव डावखरे तसेच उच्च शिक्षण विभागाचे संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांचे मनःपूर्वक आभार मानले आहेत.

बैठकीस वित्त राज्यमंत्री मा. आशिष जयस्वाल, प्रधान सचिव उच्च व तंत्र शिक्षण वेणुगोपाल रेड्डी, सह सचिव वित्त विभाग डॉ. माधव वीर, उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर, उच्च शिक्षण उपसचिव प्रताप लुबाळ, कक्ष अधिकारी विनायक टीमके, सह संचालक डॉ. अर्चना बोऱ्हाडे तसेच महाराष्ट्र राज्य महाविद्यालय शिक्षकेतर कर्मचारी महासंघाचे अध्यक्ष . राजा बढे, सरचिटणीस . सुजित आर. बी. सिंग, चिटणीस दिलीप मोरे, . दिलीप पवार, . अनिल लबरे, . सुहास भगत, आशुतोष लाडे आणि अशोक जाधव उपस्थित होते.

# सरकारी व वन जमिनीचे नियमितीकरण करा; उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन

प्रतिनिधी १० ऑगस्ट

**धारणी :** धारणी तालुक्यातील बोथरा येथील आदिवासी व इतर पारंपारिक शेतकऱ्यांच्या वाहितीखालील सरकारी व वनजमिनीचे नियमितीकरण करून ७/१२ उताऱ्यावर शेती कसणाऱ्यांची नावे लावण्याबाबत उपविभागीय अधिकारी मा. सिद्धार्थ शुक्ला व गटविकास अधिकारी पंचायत समिती धारणी यांना धनंजय सायरे समता फेलो कोरो इंडिया यांच्या मार्गदर्शनाखाली व सदर निवेदक यांनी निवेदन देण्यात आले. निवेदनामध्ये गेल्या अनेक वर्षांपासून ( सन १९९०-९९) किंवा त्या पूर्वीपासून मौजा बोथरा येथील जमिनीवर उपजिविकेसाठी शेती करत असून शांततापूर्वक ताबा बाळगून असल्याचे सांगितले.




ताबा असताना महसूल व वन विभागाने वेळोवेळी कायदेशीर कारवाई दंड पावती, सन २००७-२००८ मध्ये नायब तहसीलदार कार्यालय धारणी यांच्याकडून अतिक्रमण जमिनीचे पट्टे मिळण्याबाबत/ चौकशीबाबत नोटिसा प्राप्त झाल्या होत्या. शासनाला प्रदान केलेल्या एकत्रित जमीन महसुलाच्या रकमेची पावती देण्यात आली होती. असे असताना आजमितीस या जमिनी महसूल/वनविभागाच्या नावे सरकारी म्हणून नोंदवलेल्या आहेत.आम्हाला अद्याप आमचा हक्काचा ७/१२ उतारा मिळालेला नाही.७/१२ उतारा नसल्यामुळे शासकिय योजना, पिक कर्ज, किंवा नैसर्गिक आपत्तीच्या वेळी कोणतीही मदत मिळत नसल्याचे वंचित शेतकऱ्यांनी सांगितले. हा परिसर पेसा (PESA) आणि अनुसूचित क्षेत्रात येत असल्याने तसेच ताबा १३ डिसेंबर २००५ च्या पूर्वीचा असल्याने 'अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी वन हक्क मान्यता) अधिनियम २००६ मधील कलम ३(१)(अ) आणि महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६' च्या प्रचलित नियमितीकरण धोरणानुसार जमिनीच्या मालकी हक्कास ७/१२ उताऱ्यास पूर्णपणे पात्र असल्या बाबतचे तसेच तात्काळ पडताळणीचे आदेश देऊन जमिनीचे रीतसर नियमितीकरण करून ७/१२ उताराच्या मालकी/ भोगवतदार रकान्यात सदर शेतकऱ्याचे नावे लावण्यात यावे असे निवेदन दिले . निवेदन स्विकारताना उपविभागीय अधिकारी सिद्धार्थ शुक्ला यांनी समाधान कारक चर्चा करून योग्य मार्ग काढुया असे आवाहन त्यांनी दिले.

# श्रावणमास म्हणजे महिलांच्या जीवनात चैतन्य व आनंदाची पर्वणी - आ. सुलभा खोडके

प्रतिनिधी १० ऑगस्ट

**अमरावती:** श्रावणमास म्हणजे महिलांच्या जीवनात चैतन्य, आनंद आणि सांस्कृतिक परंपरांची पर्वणी आहे. अशा उपक्रमांमुळे महिलांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळतो, आत्मविश्वास वाढतो आणि सामाजिक ऐक्य अधिक दृढ होते. असे प्रतिपादन आमदार - सौ. सुलभाताई खोडके यांनी केले. श्रावण महिन्याच्या मंगलमय वातावरणात महिलांच्या कला, संस्कृती आणि उत्साहाला प्रोत्साहन देणारा 'श्रावण सोहळा २०२६' हा रंगतदार कार्यक्रम वुमेन्स 24 चॅनलतर्फे स्थानिक जोशी हॉल येथे उत्साहात आयोजित करण्यात आला. महिलांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला



व्यासपीठ उपलब्ध करून देणाऱ्या या उपक्रमाचे आ.सौ.सुलभाताई खोडके यांनी कौतुक करत आयोजकांचे मनःपूर्वक अभिनंदन केले. यावेळी वुमेन्स 24 चॅनलच्या संपादीका - प्रीती कुमरे साहू तसेच उपसंपादिका - जयश्री चांडक यांनी आमदार महोदयांचे स्वागत केले. तसेच या आयोजनामागची रूपरेषा विशद केली. कार्यक्रमा दरम्यान श्रावण झुला, भजन व श्रावण गीत, ग्रुप व सोलो नृत्य, श्रावण क्वीन,फॅशन शो तसेच विविध आकर्षक स्पर्धा व बक्षीस वितरण अशा अनेक उपक्रमांनी उपस्थितांची मने जिंकली. तसेच विविध क्षेत्रातील नामांकित, प्रतिभाशाली व कर्तबगार महिलांचा विशेषत्वाने सत्कार देखील करण्यात आला. यावेळी महिलांच्या साज शृंगार,उपहार वस्तू व गृह सजावटीच्या वस्तूंचे स्टॉल देखील लावण्यात आले होते. कार्यक्रमाला निशा महाजन , स्वाती बडगुजर, मनीषा उपाध्याय, अनिता वर्मा, निता डाखोरे, जया बद्रे, रत्नमाला पाटील, सोनल भुतडा, प्रीती क्षीरसागर, उज्वला धंदर, भाग्यश्री पवार आदींसह विविध क्षेत्रातील नामांकित, प्रतिभाशाली व कर्तृत्वान महिला तसेच सर्वसामान्य घटकातील महिला वर्ग प्रामुख्याने उपस्थित होता. या श्रावण सोहळ्यात महिलांनी एकच जल्लोष करताच संपूर्ण वातावरण श्रावणाच्या उत्साहाने व आनंदाने भारावून गेले.




आज संसद भवन परिसरात विरोधी पक्ष नेते राहुल गांधी, प्रियंका गांधी, अखिलेश यादव यांच्यासह इंडिया आघाडीच्या खासदारांसह खासदार बळवंत वानखडे ( अमरावती लोकसभा ) यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा संसदेत या, राम मंदिरातील चंदा चोरीची चौकशी करा या मागण्यासाठी आंदोलन केले. यावेळी प्रामुख्याने काँग्रेस पार्टीच्या खासदारांसह विरोधी पक्षाचे खासदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पर्यावरण संवर्धनासाठी वृक्षारोपण ही काळाची गरज- आ. प्रविण पोटे पाटील

## भाणखेडा व रहाटगाव येथे वृक्षारोपण कार्यक्रम; पर्यावरण संवर्धनाचा दिला संदेश

प्रतिनिधी १० ऑगस्ट

**अमरावती:** भविष्यातील पिढीला स्वच्छ हवा, निरोगी पर्यावरण आणि सुरक्षित भविष्य देण्यासाठी प्रत्येक नागरिकाने किमान एक झाड लावून त्याचे संगोपन केले पाहिजे, असे आवाहन आमदार प्रविण पोटे पाटील यांनी केले. अमरावती येथील आर्ट ऑफ लिविंग आश्रम, भाणखेडा येथे आर्ट ऑफ लिविंग परिवार आणि क्रेडाई (CREDAI) ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित भव्य वृक्षारोपण कार्यक्रमात आ. प्रविण पोटे पाटील यांनी उपस्थित राहून वृक्षारोपण केले. यावेळी पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व अधोरेखित करत त्यांनी नागरिकांनी



वृक्षारोपणासोबतच लावलेल्या झाडांचे संगोपन करण्याची गरज व्यक्त केली. "झाडे ही केवळ निसर्गाचे सौंदर्य वाढवत नाहीत, तर ती मानवी जीवनाचा मुख्य आधार आहेत. वाढते प्रदूषण, बदलते हवामान आणि पर्यावरणीय असमतोलाच्या पार्श्वभूमीवर वृक्षसंवर्धन ही काळाची गरज आहे. प्रत्येकाने किमान एक झाड लावून ते जगविण्याचा संकल्प करावा," असे आ. प्रविण पोटे पाटील यांनी सांगितले. त्याचप्रमाणे रहाटगाव येथील आरोग्यसेवा कॉलनीत (स्वामी समर्थ मंदिराजवळ) नगरसेवक श्री. विनोदजी तनवैस यांच्या माध्यमातून आयोजित वृक्षारोपण कार्यक्रमास आ. प्रविण पोटे पाटील यांनी प्रमुख उपस्थिती लावून वृक्षारोपण केले. पर्यावरण संवर्धनासाठी राबविण्यात येणाऱ्या अशा उपक्रमांचे सातत्याने आयोजन होणे आवश्यक असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले.

# वल्लभ नगरमध्ये वृक्षारोपण अभियान

## दर रविवारी नियमित वृक्षारोपण करण्याचा संकल्प



**अमरावती:** पर्यावरण संवर्धन आणि परिसर हरित करण्याच्या उद्देशाने श्री. हनुमान युवक मंडळ, हनुमान मंदिर, वल्लभ नगर, अकोली रोड, अमरावती यांच्या वतीने वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी परिसरात ५० हून अधिक रोपांची लागवड करण्यात आली. कार्यक्रमाला विशेष अतिथी म्हणून ॲड. प्रशांत देशपांडे तसेच अमरावतीचे समाजसेवक चंद्रकुमार जाजोदिया (लप्पीभैया) उपस्थित होते. मान्यवरांनी स्वतः वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. यावेळी श्री. हनुमान युवक मंडळाच्या स्वयंसेवकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. यामध्ये विनोद गोळे, अतुल बोरेकर, राजू काळे, संदीप ठाकरे, मनोहर तिवसकर, पंकज देऊळकर, वासुदेव कामनापुरे, राहुल माटोडे, रामकृष्ण भोयर, राजेश चिमोटे, रविभाऊ कळसकर, नरेश पाटमासे, शंकरराव काष्टे, सुभाष भाऊ खंडागळे, वैभव खरड, राजूभाऊ पांडे, नांदुरकर काका, नंदकिशोर पेटकर, मकवाने राऊत तसेच नंदू घुमडे यांची उपस्थिती होती.

# डॉ पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालयात दहावे किडनी प्रत्यारोपण यशस्वी

## आईने दिले मुलाला नवजीवन

प्रतिनिधी १० ऑगस्ट

**अमरावती:** स्थानिक डॉ पंजाबराव देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय अमरावती येथे आईने आपल्या पस्तीस वर्षीय मुलाला किडनी दान करून दिला पुनर्जन्म. व डॉ पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालयातील ही यशस्वी दहावी किडनी प्रत्यारोपण शस्त्रक्रिया ठरली.

सातूर्णा, साईनगर भागातील, अमरावती निवासी , खाजगी नोकरी करणारा, एका सामान्य कुटुंबातील मंगेश किसनराव नेरकर हा गेल्या पाच,सहा महिन्यापासून किडनी आजाराने त्रस्त होता. शहरातील डॉ निखिल बडनेरकर, नेप्रोलॉजिस्ट यांच्याकडे तो उपचार घेत असताना, त्याला डॉक्टरांनी किडनी प्रत्यारोपण हा यावरील प्रभावी उपचार सुचविला, यात मंगेश ची पासष्ट वर्षिय आई शोभा किसनराव नेरकर आपल्या मुलाला किडनी दान देण्यास तयार झाली. सर्व तपासणीअंती आपल्या मुलाच्या भविष्याचा विचार करता खंबीर मनाने, स्वतः किडनी दान करून केवळ आपल्या मुलाचे प्राणच वाचवले नाही, तर एक आई आपल्या मुलाच्या प्रेमापोटी



आपला एक अवयव देखील दान करु शकते, असा आदर्श समाजा समोर ठेवला व समाजाला अवयदानाचा संदेश दिला. यात त्यांच्या सर्व नातेवाईकांनी देखील संमती दिली.

श्री. शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख, महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ अनिल देशमुख, वैद्यकीय अधीक्षक डॉ पवन टेकाडे, डॉ सोमेश्वर निर्मळ यांच्या मार्गदर्शनाखाली यूरोलॉजिस्ट डॉ राहुल पोटोडे, डॉ राहुल घुले,डॉ प्रतीक चिरडे, डॉ आयुष हेडा, डॉ अक्षय बोराडे, नेफ्रॉलॉजिस्ट डॉ निखिल बडनेरकर, बधीरीकरण तज्ञ डॉ विजया पाटील, डॉ दिपाली गोटे, डॉ रोहित हातगावकर, डॉ ऐश्वर्या नायर, डॉ अंजली कोथळकर ,डॉ कल्याणी तामगाडगे यांचा मोलाचा वाटा होता. चार-पाच तास चाललेली ही दहावी शस्त्रक्रिया यशस्वी पूर्ण झाली. रुग्ण व नातेवाईकांचे समुपदेशन, वैद्यकीय चाचण्या, पोलीस व्हेरिफिकेशन, कायदेशीर बाबीची पूर्तता व इतर कागदपत्राची पूर्तता करून प्राधिकरण समिती समोर सादर करणे व प्रत्यक्ष मुलाखती द्वारे शस्त्रक्रिये करीता मान्यता मिळवून घेणे या सर्व बाबी ट्रान्सप्लांट कॉर्डिनेटर सतीश वडनेरकर यांनी यशस्वीरित्या पूर्ण केल्या. तसेच शस्त्रक्रिया पूर्व तयारीमध्ये रुग्णालय व्यवस्थापक डॉ श्रीकांत फुटाणे, ऋग्वेद देशमुख, मेट्रन चित्रा देशमुख, एम एस डब्ल्यू , अनिकेत माहोरे, सहाय्यक, आरती मोरांडे यांचे सहकार्य लाभले. प्राधिकरण समिती अध्यक्ष डॉ अनिल देशमुख, डॉ पवन टेकाडे, डॉ मंगेश मेंढे, उपसंचालक, आरोग्य सेवा, अकोला प्रतिनिधी, डॉ अविनाश लव्हाळे सेवानिवृत्त उपसंचालक, आरोग्य सेवा, डॉ दिनेश वाघाडे, एनजीओ प्रतिनिधी, आयएमए अध्यक्ष, डॉ किशोर बनसोड, यांनी रुग्ण व नातेवाईक यांच्या सोबत प्रत्यक्ष मुलाखती द्वारे संवाद साधून व कागदपत्राची पडताळणी करून शस्त्रक्रिया करिता मान्यता दिली.

# क्रांती दिनानिमित्त अमरावतीत शहीदांना अभिवादन

## क्रांती ज्योती मशाल यात्रेत काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा उत्स्फूर्त सहभाग

### स्वातंत्र्यसंग्रामातील हुतात्म्यांच्या त्यागाचे स्मरण

प्रतिनिधी १० ऑगस्ट

**दर्यापूर:** भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील ऐतिहासिक 'भारत छोडो' आंदोलनाच्या स्मृती जागवणाऱ्या ९ ऑगस्ट क्रांती दिनानिमित्त अमरावती शहर काँग्रेस कमिटी व सेवादल यांच्या वतीने आज शहीदांना अभिवादन करण्यात आले.

रविवार, द९ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ९.०० वाजता शहीद स्मारक, नेहरू मैदान, अमरावती येथे आयोजित या कार्यक्रमात स्वातंत्र्यसंग्रामातील हुतात्म्यांना मानवंदना देऊन अभिवादन करण्यात आले.भारतीय सैन्यातील माजी सैनिक यांनी देखील मोठी उपस्थिती दर्शवून मानवंदना दिली. यावेळी शहीद स्मारक परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.समस्त मंडळींनी वृक्षारोपणात सहभाग



घेतला.त्यानंतर शहीद स्मारकापासून महात्मा गांधीजींच्या पुतळ्यापर्यंत जयस्तंभ चौक पर्यंत 'क्रांती ज्योती मशाल यात्रा' काढण्यात आली.

क्रांती ज्योती मशाल यात्रेदरम्यान स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागाचे स्मरण करण्यात आले. देशाच्या स्वातंत्र्यासाठी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या हुतात्म्यांच्या बलिदानातून प्रेरणा घेऊन देशाची लोकशाही, संविधान आणि स्वातंत्र्याची मूल्ये अधिक मजबूत करण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला.यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना माजी पालकमंत्री डॉ. सुनील देशमुख, शहर काँग्रेस अध्यक्ष बबलू शेखावत व मनपा विरोधी पक्षनेते विलास इंगोले यांनी ९ ऑगस्ट क्रांती दिनाचे ऐतिहासिक महत्त्व विशद केले. ९ ऑगस्ट १९४२ रोजी महात्मा गांधीजींच्या नेतृत्वाखाली सुरू झालेल्या 'भारत छोडो' आंदोलनाने देशाच्या स्वातंत्र्य लढ्याला निर्णायक दिशा दिली. असंख्य स्वातंत्र्यसैनिकांनी अन्यायाविरुद्ध लढा देत देशासाठी त्याग आणि बलिदान केले.त्यांच्या संघर्षामुळेच आज आपण स्वतंत्र भारतात श्वास घेत आहोत,असे त्यांनी नमूद केले."हुतात्म्यांचे बलिदान ही केवळ इतिहासाची आठवण नसून,देशाच्या लोकशाही आणि संविधानिक मूल्यांचे रक्षण करण्याची प्रेरणा आहे," असा संदेश यावेळी देण्यात आला.स्वातंत्र्यसैनिकांनी दिलेल्या बलिदानाचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून देशाच्या एकता,अखंडता आणि लोकशाहीच्या रक्षणासाठी प्रत्येकाने योगदान द्यावे,असे आवाहनही करण्यात आले. कार्यक्रमाच्या माध्यमातून 'शहीदों को सलाम, देश को प्रणाम' या भावनेने हुतात्म्यांना आदरांजली अर्पण करण्यात आली.अमरावती शहर काँग्रेस कमिटीच्या सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून शहीदांना अभिवादन केले.यावेळी काँग्रेस नेत्यांनी आगामी १५ ऑगस्ट २०२६ रोजी ऐतिहासिक जवाहर गेट येथे आयोजित करण्यात येणाऱ्या स्वातंत्र्य दिनाच्या ध्वजारोहण कार्यक्रमास अमरावतीकरांनी तसेच काँग्रेसच्या सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे,असे आवाहन केले.

# फोकस

● अतिष देशमुख @ वाशीम ●



* पेरणी पुर्वी अनुदानाचे बियाणे मिळत नाही.
* पेरणीसाठी बँक वेळेवर कर्ज देत नाही.
* बियाण्यातून फसवणूक, कारवाई नाही
* फसवणुकीनंतर मदतही नाही, न्याय नाही.
* खऱ्या शेतकऱ्यांपर्यंत योजना पोहोचत नाही.
* हजारो तक्रारी करूनही दखल नाही.
* अधिकारी सन्मानाची वागणूक देत नाही.
* दुबार तिबार पेरणीच्या संकटात साथ नाही.
* कागदावरच्या योजना प्रत्यक्षात भेटत नाही.
* नुकसानीचे पंचनामे नाही, सर्व्हे नाही.
* निसर्गासोबत अधिकाऱ्यांचीही साथ नाही.
* पाणी आहे पण वीज मिळत नाही .
* पीक विम्याची रक्कम मिळाली नाही.

## कृषी मंत्र्याच्या 'पालक' जिल्ह्यात...



# बळीराजावर अन्याय, कधी मिळणार न्याय !

## शासनाची 'अवकळा', जीवनाचा 'उन्हाळा'

सदैव संकटात नैसर्गीक संकटाबरोबर कृत्रीम संकाटाने बळीराजा दरवर्षी होरपळून निघत आहे. अतिवृष्टीमुळे हातचे आलेले पीक नष्ट झाले. शासनाने घोषीत केलेली मदत अद्यापही मिळाली नाही. जी मिळत आहे ती अत्यल्प आहे. पेरणी पूर्वी बळीराजाला अनुदानाचे बी बियाणे मिळत नाही. कृत्रीम खत टंचाईला सामोरे जावे लागते. त्यातच बोगस बियाण्यातून फसवणूक होते. दुबार तिबार पेरणीचे संकट ओढावते. एवढे करूनही ऐन हंगामाच्या तोंडावर आलेला हातचा आलेला घास नापिकीमुळे जाते. बोगस बियाणे प्रकरणी ५ हजार तक्रारी करून कारवाई नाही झाली आणि मदतही नाही झाली अतिवृष्टीचा सर्व्हे कागदावरच झाला. मात्र शासनाने जाहीर केलेली मदत वाशीम जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मिळालाच नाही. या सर्व गोष्टीला जिल्ह्यातील अधिकारीच जबाबदार आहे. शासनानेही त्यावर कहरच केला. पीक विम्याचे पैसेही शेतकऱ्यांना अद्याप मिळाले नाही. सोयाबीनचे अत्यल्प उत्पादन झाले. वरून शेतमालाचे भाव व्यापाऱ्यांनी पाडले. इतर जिल्ह्यात पीक विम्याचे पैसे मिळाले असतांना अद्यापही वाशीम जिल्ह्यातील शेतकरी पीक विम्यापासून वंचित आहेत. शासकीय योजना खऱ्या शेतकऱ्यांपर्यंत पोहोचत नसल्याने शासनाची अवकळा अन् जीवनाचा उन्हाळाच झाला आहे . कृषी मंत्र्याच्या पालक जिल्ह्यातच बळीराजावर अन्याय होत आहे. त्यामुळे न्याय कधी मिळणार अशी अपेक्षा बळीराज करीत आहेत.

## शेतकऱ्यांची फसवणूक सावधान...






















# शेतकऱ्यांचे लुटारू सक्रीय, अधिकारी निष्क्रीय...

## खताची लिंकींग थांबवा, अन्यथा आंदोलन - दामुअण्णा इंगोले

बोगस बियाणे तथा बनावट रासायनिक खते माथी मारून शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात आर्थिक लुबाडणूक करणारी लुटारूंची टोळी पून्हा एकदा जिल्ह्यात सक्रीय झाली असल्याचे धक्कादायक वास्तव समोर येत आहे. तर अधिकारी निष्क्रीय दिसत आहेत. आज डिएपी खताची रेल्वेची रॅक आली असून खताबरोबर लिंकींग करून खते विकण्याच्या तयारीत लूटारू टोळी तयारीत आहे.

मागील वर्षी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे विदर्भ प्रमुख दामुअण्णा इंगोले यांनी अरिहंत कंपनीच्या बोगस सुपर फॉसेट खंताविरोधात कृषी विभागाकडे केलेल्या तक्रारीने ही बाब उजेडात आणली होती. यावेळेस कृषी विभागाने वेळेवर सजगपणा न दाखविल्यास शेतकरी अडचणीत येण्याची शक्यता नाकारता येत नाही. बळीराजाने पेरणी पुर्व मशागत करून बी-बियाणे खरेदीला सुरूवात करणार आहे. त्यामुळे त्यांनी फसवणुकीपासून सावध राहावे. अगोदरच डिझेल टंचाईने शेतकरी हैराण झाला आहे. अनेक संकटाला तोंड देत जिल्ह्यातील शेतकरी आता शेतीच्या कामाला लागला असून चांगला पाऊस पडण्याचे संकेत दिल्याने बि-बियाण्याच्या खरेदीला सुरूवात केली आहे. त्यामुळे आजमितीा शेतकऱ्यांची मशागतीसोबतच खते व बियाणे खरेदी करण्याची लगबगही सुरू झाली आहे. नेमका याच लगबगीचा फायदा घेत बाजारात शेतकऱ्यांना लुटण्यासाठी काही लुटारुंची टोळी सक्रीय झाली आहे. अधिक पैसा कमविण्याच्या हव्यासातून सदर लुटारू बोगस बियाणे किंवा खते शेतकऱ्यांच्या माथी मारून त्यांची आर्थिक पिळवणूक करण्याचा गोरखधंदा या लुटारुंकडून सुरू असते. टिएल कंपनीच्या बोगस सोयाबीन बियाणे सुपर फॉस्फेट विक्रीतून हा बोगसपणा पून्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे. सदर कंपनीच्या मिश्र खतांचे नमुने गुणवत्ता तपासणीत निकृष्ठ असल्याचे समोर आले असतानाही त्याची विक्री सर्रास सुरू आहे.

तर शेतकऱ्यांच्या फसवणुकीसाठी डीएपी खातासोबत नॅनो व सल्फर खाताची लिंकींग सुरू असून ती थांबविण्याची मागणी शेतकरी नेते दामुअण्णा इंगोले यांनी केली आहे. केंद्र सरकारच्या अनुदानानंतर खतांच्या किमती कमी झाल्या असतानाही काही दुकानदार वाढीव किमतीतच विक्री करीत आहेत. कृषी विभागाने हा सर्व प्रकार थाबविणे गरजेचे आहे.

## *निकृष्ट खते व बियाण्यांची सर्रासपणे विक्री * बळीराजा पुन्हा अडचणीत येण्याची शक्यता * प्रशासनाने वेळीच दखल घ्यावी

### चार वर्षीच्या तक्रारीवर कारवाई नाही

कोरोनाच्या संकटात मागील चार वर्षापूर्वी बोगस बियाण्यातून शेतकऱ्यांची मोठी फसवणूक झाली होती. दुबार-तिबार पेरणीनंतरही शेतकऱ्यांनी पेरलेले बियाणे उगवलेच नाही. त्यामुळे निराश झालेल्या शेतकऱ्यांनी कृषी विभागाकडे तब्बल ५ हजार तक्रारी केल्या मात्र, कंपण्या व कृषी सेवा केंद्राच्या हातातील बाहूली झालेल्या कृषी विभागाला यामध्ये काही गांभिर्य दिसले नाही. चार वर्ष लोटले तरी या तक्रारींवर काहीच कारवाई झाली नाही ही वस्तूस्थिती आहे. बोगस बियाण्यांमधून झालेली आर्थिक हानी भरून निघावी यासाठी शेतकऱ्यांना मदतीची आस होती परंतु, त्यांचा भ्रमनिरास झाला.



### बि-बियाणे व खतही मिळेना बँक पीक कर्जही देईना काय करावे कळेना...

कृतिम खत टंचाई निर्माण करून शेतकऱ्यांना अडचणीत आणून लूटण्याचे षडयंत्र आखणे सुरू आहे. बियाणे ही मिळेना, कर्ज जाहीर करूनही बँक पीक कर्ज देईना, बळीराजाला काय करावे कळेना, असे झाले आहे. निसर्गाची साथ साथ मिळत नसल्याने वारंवार संकटाचा सामाना करणाऱ्या बळीराजाला आता पुन्हा खत बि-बियाण्यासाठी वनवन भटकावे लागत आहे. मान्सुन चांगला बरसनार असल्याने समाधानी असलेल्या शेतकऱ्यांना खतासाठी व बि-बियाण्यासाठी फिरावे लागत आहे. शेतीच्या बांधावर खते उपलब्ध करून देण्याची योजना कागदावरच आहे.













## बातमी खास, दखल हमखास, सिटी न्युज सुपरफास्ट...

# अखेर शाळेनेच केला कचरा साफ !

### *दोन वृत्तांनंतर अखेर कचरा हटविला; ग्रामपंचायतीच्या स्वच्छता व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह,
### *नागरिकांना पुन्हा कचरा न टाकण्याचे मुख्याध्यापक शिंदे यांचे आवाहन

● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●

शैक्षणिक संस्थेसमोर साचलेल्या कचऱ्याचा प्रश्न सिटी न्यूज सुपरफास्टने सलग दोन वृत्तांच्या माध्यमातून मांडल्यानंतर अखेर त्याची दखल घेण्यात आली. मात्र विशेष म्हणजे, कचरा हटविण्यासाठी ग्रामपंचायतीची यंत्रणा पुढे येण्याऐवजी शैक्षणिक संस्थेनेच पुढाकार घेत परिसरातील कचरा साफ केला. त्यामुळे ग्रामपंचायतीच्या स्वच्छता व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

६ ऑगस्ट रोजी सिटी न्यूज सुपरफास्टने 'विद्येच्या मंदिरासमोर कचऱ्याचे साम्राज्य' या मथळ्याखाली श्री शिवाजी हायस्कूल व महाविद्यालयासमोरील अस्वच्छतेचा मुद्दा मांडला होता. यानंतरही परिस्थिती कायम असल्याने ८ ऑगस्ट रोजी 'आमदारांच्या शैक्षणिक संस्थेसमोर कचऱ्याचा डेपो' या मथळ्याखाली पुन्हा वृत्त प्रकाशित करण्यात आले. मेहकर–मालेगाव राष्ट्रीय महामार्गालगत असलेल्या या परिसरात कचरा साचल्याने दुर्गंधीचा त्रास होत असल्याचे वृत्तातून निदर्शनास आणून देण्यात आले होते. या दोन्ही वृत्तांची दखल घेत श्री शिवाजी हायस्कूल व महाविद्यालय प्रशासनाने स्वतः पुढाकार घेत शैक्षणिक संस्थेसमोरील कचरा साफ केला. त्यामुळे परिसराला स्वच्छ स्वरूप प्राप्त झाले आहे. मात्र, सार्वजनिक परिसरातील कचरा नियमितपणे उचलणे आणि स्वच्छता राखणे ही स्थानिक स्वच्छता व्यवस्थेची जबाबदारी असताना शाळेलाच कचरा साफ करण्याची वेळ का आली? असा सवाल आता नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. ग्रामपंचायतीने केवळ एखाद्या वृत्तानंतर किंवा तक्रारीनंतर हालचाल करण्याऐवजी सार्वजनिक ठिकाणी नियमित कचरा संकलन, साफसफाई आणि कचरा टाकण्यास प्रतिबंध यासाठी कायमस्वरूपी व्यवस्था करणे गरजेचे आहे. शैक्षणिक संस्थेने पुढाकार घेऊन परिसर स्वच्छ केला आहे. त्यामुळे नागरिकांनी यापुढे या ठिकाणी कचरा टाकू नये. सार्वजनिक परिसर स्वच्छ ठेवणे ही केवळ प्रशासनाची नव्हे, तर प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. सिटी न्यूज सुपरफास्टच्या दोन वृत्तांची दखल घेत शैक्षणिक संस्थेने कचरा साफ केला; आता ग्रामपंचायत प्रशासन कायमस्वरूपी स्वच्छता व्यवस्था उभी करणार का? हा प्रश्न मात्र कायम आहे.






# अंचलची सृष्टी चमकली, आयआयटी दिल्लीत झळकली !

● सिटी न्युज ब्युरो @ केनवड ●

रिसोड तालुक्यातील अंचल येथील शेतकरी कुटुंबातील सृष्टी भगवान जुनघरे हिने आपल्या मेहनतीच्या जोरावर मोठे यश मिळविले आहे. जेईई ॲडव्हान्स परीक्षेत देशात ३९४ वा क्रमांक मिळवत तिने आयआयटी दिल्लीच्या संगणक विज्ञान शाखेत प्रवेश मिळविला. आयआयटी दिल्लीतील शिक्षण पूर्ण करून सृष्टी आता बंगळुरू येथील क्वालकॉम कंपनीत ५१ लाख रुपयांच्या वार्षिक पॅकेजवर कार्यरत आहे.

सृष्टीने आयआयटी दिल्लीमधून पदवी आणि पदव्युत्तर अशा दोन पदव्या पूर्ण केल्या आहेत. तिचा शैक्षणिक प्रवास अंचल, केनवड, डोणगाव, लातूर आणि दिल्ली असा झाला. शिक्षणादरम्यान सृष्टीला कॅनडा येथे दहा आठवड्यांचे प्रशिक्षण घेण्याची संधी मिळाली. तसेच जग्वार-टाटा कंपनी, बंगळुरू येथेही तिने प्रशिक्षण पूर्ण केले. ८ ऑगस्ट २०२६ रोजी सृष्टीने आयआयटी दिल्लीतील शिक्षण पूर्ण केले. पदवीदान सोहळ्यात तिचा गौरव करण्यात आला. सृष्टीच्या या यशामागे तिची मेहनत, आई-वडिलांचे मार्गदर्शन आणि कुटुंबीयांचे पाठबळ आहे. तिचे वडील भगवानराव जुनघरे आणि सृष्टी हे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षण व करिअरबाबत मार्गदर्शन करीत आहेत. अंचलसारख्या ग्रामीण भागातून आलेल्या सृष्टीने मिळविलेले हे यश वाशिम जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब असून, तिची यशोगाथा ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.



सिटी न्यूज सुपरफास्ट बुलडाणा

सोमवार, दि. १० ऑगस्ट २०२६ Web. http://epaper.citynewssuperfast.com



# अंबादासजी दानवेंकडून अतिवृष्टीग्रस्त भागाची पाहणी

प्रतिनिधी १० ऑगस्ट

**खामगाव :** बुलढाणा जिल्ह्यातील जळगाव जामोद तालुक्यातील एनगाव, एलोरा-चावरा आणि कुराणगाड खुर्द या गावांमध्ये अतिवृष्टीमुळे झालेल्या शेतीच्या नुकसानीची तसेच खरडून गेलेल्या शेतजमिनीची माजी विरोधी पक्षनेता आ. अंबदासजी दानवे यांनी पाहणी केली.



संपूर्ण जळगाव जामोद तालुक्यात अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणावर शेतीचे नुकसान झाले आहे. अनेक ठिकाणी सुपीक माती खरडून गेल्याने शेतकऱ्यांसमोर दुबार पेरणीचे मोठे संकट उभे राहिले आहे. अद्यापही अनेक शेतकऱ्यांचे पंचनामे झालेले नाहीत. त्यामुळे शेतकरी हवालदिल झाले असून शासनाने तातडीने या परिस्थितीची गंभीर दखल घेण्याची गरज आहे.

यावेळी एका वृद्ध महिला शेतकरी महिलेने अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची व्यथा सांगताना आपल्या अश्रूना वाट मोकळी करून दिली. तिचे दुःख पाहून मन हेलावून गेले. शेतकऱ्यांच्या या वेदना केवळ कागदावरील पंचनाम्यांपुरत्या मर्यादित न राहता शासनाने प्रत्यक्ष मदतीच्या माध्यमातून त्यांच्या पाठीशी उभे राहणे आवश्यक आहे. शासनाने तातडीने सर्व नुकसानीचे पंचनामे पूर्ण करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्यावी. खरडून गेलेल्या शेतजमिनी पुन्हा पिकायोग्य करण्यासाठी विशेष मदत उपलब्ध करून द्यावी आणि दुबार पेरणीसाठी आवश्यक आर्थिक मदत तातडीने जाहीर करावी, अशी मागणी केली. याप्रसंगी शिवसेना प्रवक्ता जयश्रीताई शेळके, जिल्हाप्रमुख गजानन वाघ, दत्तात्रय लहाने, दत्तात्रय पाटील आणि नंदू कऱ्हाडे उपस्थित होते

# विद्यार्थी व शिक्षकांनी घेतली व्यसनमुक्तीची प्रतिज्ञा



प्रतिनिधी १० ऑगस्ट

**शेगाव :** प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाच्या माजी मुख्य प्रशासिका ब्र.कु. दादी प्रकाशमणी यांच्या पावन स्मृतिनिमित्त 'नशामुक्त भारत अभियान' तसेच 'माझे गाव, आरोग्य-संपन्न गाव अभियान' अंतर्गत जि.प. माध्यमिक शाळा, तरोडा (डी) येथे व्यसनमुक्ती व आरोग्य जनजागृती कार्यक्रम उत्साहात पार पडला. यावेळी १६० विद्यार्थी व शिक्षकांनी नशामुक्तीची प्रतिज्ञा घेतली. कार्यक्रमात विद्यार्थ्यांना तंबाखू, गुटखा, सिगारेट, मद्य तसेच अन्यअमली पदार्थांच्या सेवनामुळे होणारे शारीरिक, मानसिक, सामाजिक व आर्थिक दुष्परिणाम याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. व्यसनापासून दूर राहण्यासाठी आत्मसंयम, सकारात्मक विचार, चांगली संगत, योग-ध्यान, खेळ आणि निरोगी जीवनशैलीचा अवलंब करण्याचे आवाहन करण्यात आले. यावेळी ब्रह्माकुमारी पूजा दीदी यांनी उपस्थित विद्यार्थी व शिक्षकांना नशामुक्तीची प्रतिज्ञा दिली. आ. केंद्र अडसूळचे आरोग्य सहाय्यक विजय हिंगणे यांनी व्यसनामुळे बीपी, मधुमेह, कॅन्सर तसेच आतड्यांसह विविध अवयवांवर होणाऱ्या गंभीर परिणामांची माहिती देत विद्यार्थ्यांना व्यसनापासून दूर राहण्याचा संदेश दिला. कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले. ते ब्रह्माकुमारी पल्लवी हिंगणे यांनी सादर केलेले व्यसनमुक्तीवरील प्रभावी पोवाडे. पोवाड्याच्या माध्यमातून त्यांनी व्यसनाचे दुष्परिणाम आणि नशामुक्त जीवनाचा संदेश प्रभावीपणे मांडला. कार्यक्रमादरम्यान डेंग्यू व मलेरिया प्रतिबंधाबाबतही विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करण्यात आली. आ. केंद्र अडसूळ अंतर्गत जानोरी उपकेंद्राच्या समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. दीपा बरवट यांनी डेंग्यू व मलेरिया प्रतिबंधात्मक उपाययोजनांबाबत मार्गदर्शन केले. यावेळी आरोग्य सेविका श्रीमती सोळंके, आरोग्य सेवक निलेश देशमुख, आशा स्वयंसेविका श्रीमती बाठे, अंगणवाडी सेविका व मदतनीस उपस्थित होते.

# खेडापती हनुमान मंदिर परिसरात 100 वृक्षांची लागवड

## जिजाऊ मॉर्निंग फिटनेस क्लबचा उपक्रम

प्रतिनिधी १० ऑगस्ट

**मलकापूर :** तालुक्यातील बेलाड शिवारातील जागृत खेडापती हनुमान मंदिर परिसरात जिजाऊ मॉर्निंग फिटनेस क्लबच्या वतीने रविवार, दि. ९ ऑगस्ट रोजी वृक्षारोपण उपक्रम राबविण्यात आला. मंदिराच्या सुमारे चार एकर खुल्या परिसरात क्लबच्या सदस्यांनी श्रमदान करून १०० देशी वृक्षांची लागवड केली. या उपक्रमात वड, पिंपळ, कडुनिंब, शिसव, चिंच, आवळा, करंज आदी देशी प्रजातींच्या रोपांची लागवड करण्यात आली. जिजाऊ मॉर्निंग फिटनेस क्लबच्या सदस्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत श्रमदान केले. जिजाऊ मॉर्निंग फिटनेस क्लब सोबत जागर फाउंडेशन, खेडापती हनुमान मंदिर संस्थेचे पदाधिकारी तसेच बेलाड येथील ग्रामस्थांनीही उपक्रमात सहभाग घेतला. नव्याने वृक्षारोपण करण्यासोबतच मंदिर परिसरात यापूर्वी लावण्यात आलेल्या वृक्षांचे संवर्धन व संगोपन करण्यात आले. मागील उन्हाळ्यात मंदिरालगतच्या नाल्याचे खोलीकरण व गाळ उपसा करण्यात आल्याने परिसरात जलसाठा निर्माण झाला आहे. नव्याने त्यामुळे लावण्यात आलेल्या वृक्षांना पाण्याची उपलब्धता होण्यास मदत होणार आहे. तसेच मंदिर परिसराला तारांचे कुंपण करण्यात आले आहे. भविष्यात या वृक्षांमुळे मंदिर परिसराच्या सौंदर्यात आणखी भर पडेल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला

# कृषी उत्पन्न बाजार समितीतील नियमबाह्य गोवंश खरेदी-विक्रीविरोधात युवा हिंदू प्रतिष्ठानचे गोमाता संरक्षण अभियान

## गौमाता संरक्षण अभियान

प्रतिनिधी १० ऑगस्ट

खामगांव : स्थानिक चिंतामणी मंदिर परिसरात रविवार, ९ ऑगस्ट २०२६ रोजी युवा हिंदू प्रतिष्ठानच्या वतीने गोरक्षा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत गोहत्या, गोतस्करी आणि गोरक्षकांवर जाणीवपूर्वक दाखल केले जाणारे खोटे गुन्हे यांसारख्या गंभीर प्रश्नांवर सविस्तर चर्चा झाली.

खामगाव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या अंतर्गत दर गुरुवारी गुरांचा बाजार (ढोर बाजार) भरतो. गोसेवा आयोगाच्या नियमावलीनुसार गोवंश खरेदी-विक्री करताना प्रत्येक गुराचे 'इअर टॅगिंग', वैद्यकीय प्रमाणपत्र आणि वाहतुकीचा परवाना असणे बंधनकारक आहे. मात्र, या बाजारात हे सर्व नियम धाब्यावर बसवून गोवंशाची अवैध खरेदी-विक्री राजरोसपणे सुरू आहे. याच त्रुटींचा फायदा घेऊन जिहादी कसाई उघडपणे गोवंशाला कत्तलीसाठी घेऊन जातात. परिणामी, गोहत्येचे प्रमाण प्रचंड वाढले आहे. या संदर्भात बाजार समिती प्रशासनाशी अनेकदा पत्रव्यवहार करून आणि वारंवार विनंती करूनही त्यांच्याकडून कोणतीच कारवाई होत नाही. यावरून बाजार समितीचे आणि या कसायांचे लागेबांधे असल्याचे आता स्पष्ट होत आहे. कारवाई होत नसल्याने बैठकीत सर्वांनी तीव्र संताप व्यक्त केला. या अवैध प्रकारांना आळा घालण्यासाठी सर्व गोरक्षक आणि गोसेवक आता लोकसहभागातून आपापल्या भागातील सरपंच आणि नगरसेवकांना निवेदने देणार आहेत. बाजार समितीतील हे अवैध धंदे आणि कसायांसोबतचे साटेलोटे तातडीने बंद व्हावेत, अशी मागणी या निवेदनाद्वारे केली जाईल असा निर्णय एकमताने घेण्यात आला. या चळवळीला "गौमाता संरक्षण अभियान" असे नाव देण्यात आले आहे. येत्या काळात स्थानिक लोकप्रतिनिधींसोबतच जिल्ह्यातील वरिष्ठ लोकप्रतिनिधींनाही निवेदने देऊन हे कृत्य कायमचे बंद करण्याची विनंती केली जाणार आहे. या बैठकीला युवा हिंदू प्रतिष्ठानचे पदाधिकारी, धर्मबंधू, गोरक्षक आणि गोसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठकीतील ठरावांना ह. भ. प. अनुप महाराज वानखेडे यांनी अनुमोदन दिले. लवकरच गोरक्षक घरोघरी जाऊन लोकांचा पाठिंबा मिळवतील आणि हे मोठे अभियान यशस्वी करतील, असा संकल्प यावेळी गणरायाच्या चरणी करण्यात आला.

# गुरांचे मांस विक्रीप्रकरणी चार जणांविरुद्ध गुन्हे दाखल

## शेगाव शहरातील पेठ मोहल्ल्यात दोन कारवाया

प्रतिनिधी १० ऑगस्ट

**शेगाव :** गुरांची कत्तल करून मांस विक्री होत असल्याच्या माहितीवरून शेगाव शहर पोलिसांनी पेठ मोहल्ला परिसरात दोन कारवाया करून १०५ किलो गुरांचे मांस जप्त केले. या प्रकरणी रविवारी चार जणांविरुद्ध दाखल करण्यात आले आहेत. गुन्हे सकाळी ८:४० ते दुपारी ३:१५ वाजेदरम्यान झालेल्या पहिल्या कारवाईत पोलिस उपनिरीक्षक संदीप बारींगे यांच्या फिर्यादीवरून गुन्हा नोंदविला. शेख गफ्फार शेख उस्मान (४७) व शेख वाहीद शेख महेबुब (४१, दोघे रा. पेठ मोहल्ला) हे मांस विक्री करताना आढळले. दोघांकडून प्रत्येकी ३० किलो मांस व एक सुरा, असा १२ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. दुसऱ्या कारवाईत सकाळी ८:४० ते ९:५० वाजेदरम्यान सहायक पोलिस निरीक्षक राजेंद्र पवार यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल झाला. मोहम्मद अरसलान शेख मुनीर (४०) व शेख बिलाल शेख इसाक (दोघे रा. पेठ मोहल्ला) यांच्याकडून ९ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. दोन्ही प्रकरणात कलम ५ (अ), ५ (क), ९ महाराष्ट्र प्राणी संरक्षण कायदा १९७६ (सुधारणा २०१५) सह कलम ३२५ भारतीय न्याय संहितेनुसार गुन्हे दाखल आहेत. पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक गावंडे करीत आहेत.

# सोयाबीनच्या बोगस बियाणे प्रकरणांमध्ये अहवालांना विलंब; शेतकऱ्यांना प्रतीक्षा!

प्रतिनिधी १० ऑगस्ट

**खामगाव :** तालुक्यातील सोयाबीन बोगस बियाणे प्रकरणातील अहवाल तयार करण्याच्या प्रक्रियेला विलंब होत असल्याचे स्पष्ट झाले आहे. तक्रारींची संख्या मोठी असल्याने कृषी विभागावर कामाचा ताण वाढला असून, त्यामुळे अहवाल सादर करण्यात उशीर होत असल्याची माहिती अधिकृत सूत्रांकडून देण्यात आली. खामगाव तालुक्यात एकूण ११५० तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. या सर्व तक्रारींच्या अनुषंगाने कृषी विभागाने शेतकऱ्यांच्या शेतांमध्ये जाऊन पंचनामे पूर्ण केले आहेत. बियाण्यांच्या निकृष्ट गुणवत्ते मुळे उगवण न होणे, पिकांची वाढ खुंटणे यांसारख्या समस्यांमुळे शेतकऱ्यांनी तक्रारी नोंदवल्या होत्या. पंचनामे पूर्ण करण्यासाठी मोठा कालावधी लागला.सध्या पंचनाम्यां वर आधारित सविस्तर अहवाल तयार करण्याचे काम सुरू असून, प्रत्येक प्रकरणाची छाननी करून अंतिम निष्कर्ष मांडला जात आहे. अहवालां च्या आधारे संबंधित बियाणे उत्पादक कंपन्या व विक्रेत्यांवर कारवाईचा निर्णय घेतला जाणार आहे. तपासात दोषी आढळणाऱ्या प्रकरणांमध्ये नियमानुसार दंडात्मक तसेच कायदेशीर उपाययोजना करण्यात येणार आहेत. निकृष्ट किंवा बोगस बियाण्यां मुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाल्याचे स्पष्ट झाल्यास संबंधितांवर कठोर कारवाई होण्याची शक्यता आहे.

### शेतकऱ्यांना न्याय मिळणार कधी ?

»अहवाल सादर होण्यात होत असलेल्या विलंबामुळे शेतकऱ्यांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. बोगस बियाण्यांमुळे आर्थिक नुकसान सोसावे लागलेल्या शेतकऱ्यांना तातडीने न्याय मिळावा, अशी मागणी होत आहे. प्रशासनाने अहवाल प्रक्रिया गतीने पूर्ण करून दोषींवर कारवाई करावी आणि शेतकऱ्यांना न्याय द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

### तक्रारींची संख्या मोठी असल्याने विलंब

»कृषी विभागाकडून सर्व तक्रारींची सखोल पडताळणी करूनच अहवाल तयार करण्यात येत आहेत. तक्रारींची संख्या मोठी असल्याने प्रक्रियेस काही प्रमाणात विलंब होत असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

### 1150 तक्रारींचे कृषी विभागाकडून पंचनामे पूर्ण

»सर्व तक्रारींची सखोल पडताळणी करूनच अहवाल तयार करण्यात येत आहेत. तक्रारींची संख्या मोठी असल्याने प्रक्रियेस काही प्रमाणात विलंब होत आहे. मात्र, प्रत्येक प्रकरणाची बारकाईने छाननी करून अहवाल लवकरात लवकर पूर्ण करण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

**अमोल बंड,** गुणनियंत्रक कृषी अधिकारी, खामगाव

### अंतिम अहवालाकडे लक्ष

»सोयाबीन बियाण्यांबाबत तक्रारी दाखल केलेल्या शेतकऱ्यांचे आता कृषी विभागाच्या अंतिम अहवालाकडे लक्ष लागले आहे. पंचनाम्यांमध्ये नोंदविलेल्या वस्तुस्थितीच्या आधारे संबंधित प्रकरणांमध्ये नुकसान किती झाले, याबाबत निष्कर्ष काढला जाणार आहे. अहवालानंतर दोष निश्चित झाल्यास कारवाईची प्रक्रिया पुढे जाण्याची शक्यता आहे.

# मलकापुरात कुंटणखान्यावर पोलिसांचा छापा; दोघांविरुद्ध पीटा कायद्यान्वये गुन्हा

प्रतिनिधी १० ऑगस्ट

**मलकापूर :** मलकापूर शहरातील गोपालकृष्ण नगर परिसरातील हेलोडे अपार्टमेंट येथे सुरू असलेल्या कथित वेश्याव्यवसायावर पोलिसांनी छापा टाकून एका महिलेसह एका पुरुषाला ताब्यात घेतले. या कारवाईत दोन महिलांची सुटका करण्यात आली असून, पोलिसांनी पाच मोबाईल, रोख रक्कम, कंडोमचे पाकीट व मेकअपचे साहित्य असा एकूण ९१ हजार ९६० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी मलकापूर शहर पोलीस ठाण्यात दोघांविरुद्ध अनैतिक व्यापार (प्रतिबंधक) अधिनियम १९५६ अर्थात पीटा कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, गोपालकृष्ण नगर, येथील नागरिकांनी दिलेल्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने पोलिस पथकाने ८ ऑगस्ट रोजी सायंकाळी सुमारे ७.४५ वाजता संबंधित ठिकाणी छापा टाकला. यावेळी संशोधरीत्या दोन महिला आढळून आल्या.

पोलिसांनी महिलांना विश्वासात घेऊन चौकशी केली असता, त्यांना शोभा सुनिल उन्हाळे व रामधन केशव खोडके यांच्या माध्यमातून वेश्याव्यवसाय करण्यासाठी आणण्यात आल्याचे त्यांनी सांगितल्या पोलिस नोंदीत नमूद केले आहे.

त्या अनुषंगाने पोलिसांनी आरोपी व महिलांकडून पाच मोबाईल फोन, रोख १ हजार ५०० रुपये, कंडोमचे पाकीट आणि मेकअपचे साहित्य असा एकूण ९१ हजार ९६० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी पोलिस कर्मचारी दिपाली चव्हाण यांच्या फिर्यादीवरून शोभा सुनिल उन्हाळे आणि रामधन केशव खोडके यांच्याविरुद्ध पीटा कायद्याच्या कलम ३, ४ व ५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास मलकापूर शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गणेश सुभाष गिरी यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# पिप्री अडगाव अर्धवट रस्त्यामूळे पीक बुडाले शेतकरी महिलेचा टाहो, शेताचा झाला तलाव

प्रतिनिधी १० ऑगस्ट

**सोनाळा :** 'गोरगरिबा छळू नका, पिंड फुकाचे गिळू. मीच विनवते हात जोडूनी, वाट वाकडी धरू नका' असा कंठ दाटून येणारा आर्त टाहो एका महिला शेतकऱ्याने प्रशासनाकडे फोडला आहे.



पिप्री अडगाव - मोमीनाबाद मुख्यमंत्री सडक योजनेच्या अर्धवट कामामुळे शेतात पावसाचे पाणी भरल्याने चक्क तलाव झाला आहे. यामूळे शेतातील पूर्ण पिक पाण्यात डूबले आहे. कंत्राटदार व अधिकारी यांच्या मिली भगत मुळे कुंपनाने शेत खाल्ल्याचा हा प्रकार आहे. याची मे. जिल्हाधिकारी, तहसिलदार व मुख्यमंत्री सडक योजनेच्या कार्यकरी अभियंत्याकडे तक्रार करून ही न्याय मिळत नसल्याने महिला शेतकरी श्रीमती बेबीताई निळकंठ बाहकर रा. पिप्री अडगाव ह्या हतबल झाल्या आहेत . त्यांना नुकसान भरपाई तर दुर मात्र शेताचा पंचनामा सुद्धा करण्याची तसदी प्रशासनाने घेतली नसल्याचे समोर आले आहे. पिप्री अडगाव शिवारातील गट न २७४ मधील १ हेक्टर ३० आर मधील सोयाबीन, तूर पिक शेतात पावसाचे पाणी थांबल्याने मातीत गेले आहे. निर्माणाधीन रस्त्याचे कामामुळे शेतीच्या पाण्याची वहिवाटबुजविण्यात आल्याने पावसाचे पाणी शेतात तुंबले आहे . यामुळे शेता ऐवजी येथे तलाव तयार झाला आहे. उपरोक्त शेती हीच एकमेव उदरनिर्वाहाचे साधन आहे. मात्र ते पण पाण्या खाली गेल्याने शेतकऱ्याच्या स्वप्नाचा पार चूराडा झाला आहे. गेंडयाचे कातळे पांघरलेल्या प्रशासनाला आवाज ऐकू येईल काय ? असा आक्रोश महिला शेतकरी करित आहे

# मर-वांझ रोगांवर नियंत्रण ठेवा; तुरीचे व्यवस्थापन आवश्यक

## रोगाची लक्षणे ओळखून उपाययोजना करण्याचा कृषी तज्ज्ञांचा सल्ला!

प्रतिनिधी १० ऑगस्ट

**खामगाव :** तूर पिकातून अधिक उत्पादन मिळवण्यासाठी शास्त्रीय पद्धतीने व्यवस्थापन करणे अत्यावश्यक आहे. मर व वांझ रोगांचे नियंत्रण, संतुलित खत व्यवस्थापन, योग्य वाढ नियंत्रण आणि नियमित निरीक्षण आवश्यक असल्याचे मत कृषी तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे. तूर पिकात आढळणारा मर रोग अत्यंत घातक असून त्यामध्ये पाने पिवळी पडतात, खाली झुकतात, फांद्या वाळतात आणि शेवटी संपूर्ण झाड वाळून जाते. खोड किंवा मुळाच्या आतील भाग काळसर दिसतो तसेच खोडावर तांबूस पट्टे आढळतात. परिणामी उत्पादनात मोठी घट होते. खत व्यवस्थापन करताना प्रति एकर युरिया २० ते २५ किलो, सिंगल सुपर फॉस्फेट ५० किलो किंवा डीएपी ३० ते ४० किलो देणे उपयुक्त ठरते. तसेच १०:२६:२६ या खताचाही वापर करता येतो.



### शेंडे खुडणी महत्त्वाची!

»लवकर येणाऱ्या वाणांसाठी ४५ ते ६० दिवसांत, मध्यम व उशिरा येणाऱ्या वाणांसाठी ३५ ते ४५ आणि ६५ ते ७५ दिवसांत दोन वेळा, तर उशिरा येणाऱ्या वाणांसाठी ८० ते ९० दिवसांत गरजेनुसार तिसरी खुडणी करावी. वाढ सुधारण्यासाठी १९:१०:१० खत १०० ग्रॅम प्रति पंप किंवा २ टक्के डीएपी फवारणी तसेच सूक्ष्म अन्नद्रव्ये ३० ग्रॅम प्रति पंप वापरणे फायदेशीर ठरते.

### 'बाधित झाडे मुळासकट उपटून नष्ट करा!'

»रोग नियंत्रणासाठी बाधित झाडे मुळासकट उपटून शेताबाहेर नष्ट करावीत. ४० ते ५० दिवसांनी ट्रायकोडर्मा आणि स्यूडोमोनास यांची आळवणी किंवा ड्रेचिंग करावी. एरिओफाईड, माईटसारख्या किडींच्या नियंत्रणासाठी इमिडाक्लोप्रिड १ मिली प्रति लिटर किंवा डायकोफोल २ मिली प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

### नियमित निरीक्षण आवश्यक !

»योग्य निचरा राखणे, नियमित निरीक्षण करणे, रोगग्रस्त झाडे वेळीच काढून टाकणे आणि कीड-रोगांचे प्रभावी नियंत्रण करणे या महत्त्वाच्या उपाययोजना केल्यास तूर पिकाची जोमदार वाढ होऊन अधिक फुटवे, अधिक शेंगा आणि अधिक उत्पादन मिळू शकते.




# कायदा अन् सुव्यवस्था धुळीस

# 24 तासांत दोन हत्या अन् खाकीवरच हल्ला

## निंबी मालोकार नंतर पहाटे घुसर मध्ये हत्या...

प्रतिनिधी १० ऑगस्ट

**अकोला :** अकोला जिल्ह्यात गुन्हेगारांचे मनोबल कमालीचे वाढले असून कायदा व सुव्यवस्थेची स्थिती पूर्णपणे कोलमडल्याचे गंभीर चित्र निर्माण झाले आहे. अवघ्या २४ तासांच्या कालावधीत दोन निर्घृण हत्या आणि बंदोबस्तावर तैनात असलेल्या पोलिस अधिकाऱ्यावर झालेला प्राणघातक हल्ला, या तीनही थरारक घटनांमुळे संपूर्ण जिल्हा हादरून गेला आहे. खाकीचा धाक संपल्याचे चित्र समोर आल्याने 'पोलिसच सुरक्षित नाहीत, तर सामान्य जनतेचे काय ?' असा थेट सवाल आता नागरिक विचारू लागले आहेत. अनेक आरोपी पोलिसांना सापडत नसून कोठडीत असलेल्या आरोपींना मेवा खाऊ घालणारे अधिकारी पोलिस दलात आहेत. एकीकडे शेतात रक्तरंजित थरार तर दुसरीकडे पोलिसांवरच हात उचलण्याचे धाडस गुन्हेगार करत असल्याने अकोला जिल्हा गुन्हेगारीच्या विळख्यात सापडला आहे. गृहखात्याने या वाढत्या गुन्हेगारीची गंभीर दखल घेऊन ठोस कारवाई करावी, अशी जोरदार मागणी नागरिकांमधून केली जात आहे.




### महिला पोलिस कर्मचाऱ्यासह पीएसआयवर हल्ला

हत्याकांडांसोबतच पोलिसांवरील हल्ल्याच्या घटनेने कायदा-सुव्यवस्थेचे तीन-तेरा वाजल्याचे स्पष्ट झाले आहे. जागतिक आदिवासी दिनानिमित्त महान येथे काढण्यात आलेल्या डीजे मिरवणुकीदरम्यान वाहतुकीस अडथळा होऊ नये म्हणून जमावाला बाजूला होण्यास सांगणारे पिंजर पोलिस ठाण्याचे पीएसआय अभिषेक नवघरे आणि महिला पोलिस अधिकारी वैष्णवी भांडे यांच्यावर हिंसक जमावाने हल्ला केला. जीव वाचवण्यासाठी पीएसआय नवघरे शेताच्या दिशेने धावले असता ते चिखलात पडले, तरीही जमावाने त्यांना बेदम मारहाण केली. माजी सरपंचांच्या घरात आसरा घेतल्याने त्यांचा जीव वाचला. नवघरे यांच्यावर सध्या अकोल्यातील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

### निंबी मालोकार येथे शेतकऱ्याची६ गोळ्या झाडून हत्या



पहिली धक्कादायक घटना बाळापूर तालुक्यातील निंबी मालोकार येथे रविवारी सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास घडली. शेतशिवारातील रस्ता आणि कौटुंबिक वादातून ३९ वर्षीय शेतकरी अमोल गजानन मालोकार यांच्यावर अज्ञात हल्लेखोरांनी अंधाधुंद गोळीबार केला. हल्लेखोरांनी तब्बल ६ राऊंड फायर केले, ज्यातील गोळ्या कानाखाली आणि पाठीत लागल्याने अमोल मालोकार यांचा घटनास्थळीच तडफडून मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच जिल्हा पोलिस अधीक्षक अर्चित चांडक यांच्यासह एलसीबी आणि स्थानिक पोलिस पथकांनी घटनास्थळी धाव घेतली. हल्लेखोर पसार झाले असून त्यांच्या शोधासाठी पोलिसांची ४ पथके रवाना करण्यात आली आहेत. तब्बल सहा राऊंड फायर करणारी बंदूक आरोपींकडे कशी पोहचली असा प्रश्न उपस्थित होत आहे. देशी कट्टा होता की बंदूक याचा खुलासा पोलिसांना करावा लागेल.

### निंबी मालोकारनंतर घुसरमध्ये कुऱ्हाडीने वार करून हत्या



निंबी मालोकार येथील गोळीबाराच्या घटनेचे वृत्त ताजे असतानाच अकोट फैल पोलिस ठाण्याच्या हद्दीतील घुसर परिसरात हत्येचा दुसरा प्रकार समोर आला. क्षुल्लक वादातून कुलदीप तारापुरे या तरुणावर संशयित शिलावंत गोपनारायण याने कुऱ्हाडीच्या उलट्या बाजूने भीषण हल्ला केला. या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या कुलदीप यांचा जागीच मृत्यू झाला. एकाच दिवशी घडलेल्या या दुसऱ्या हत्याकांडाने अकोला शहरासह ग्रामीण भाग सुन्न झाला आहे. शिलावंत गोपनारायण याला ताब्यात घेतले आहे. पण, किराणा उधार दिला नाही म्हणून झालेली ही हत्या कायद्याचा धाक राहिला नसल्याचे द्योतक आहे.

## तीन ऐवजी एकाच महिन्याचे धान्य का घेतील राशन कार्ड धारक ?

### अद्याप शहरात सुरू झाले नाही स्वस्त धान्याचे वितरण

प्रतिनिधी १० ऑगस्ट

**अकोला:** पावसाळ्यामुळे वाहतूक आणि साठवणुकीच्या अडचणी टाळण्यासाठी पुरवठा विभागाने ऑगस्ट महिन्यात लाभार्थ्यांना ऑगस्ट, सप्टेंबर, ऑक्टोबर अशा तीन महिन्याचे राशन एकाच वेळी देण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे जिल्ह्यातील तब्बल,,,, राशन कार्ड धारकांना दिलासा मिळणार आहे. 31 ऑगस्ट 2026 पर्यंत आगाऊ उचल आणि वाटप करण्याची प्रक्रिया पूर्ण करणे राशन दुकानदारांना बंधनकारक आहे. ऑगस्ट महिना सुरू होऊन दहा दिवस झाले आहेत शहरातील जवळपास



सर्वच राशन दुकानांमध्ये तीन महिन्यांचा धान्याचा साठा येऊन पडला आहे परंतु अद्यापही राशन दुकानदारांनी धान्याचे वाटप सुरू केले नाही. शहरातील जवळपास सर्वच राशन दुकानांसमोर लाभार्थी ग्राहक येऊन दुकान उघडण्याची वाट पाहतात. परंतु दुकान उघडत नसल्याने वाट पाहून कंटाळून निघून जातात. धान्याचे वितरण का केले जात नाही! अशी माहिती घेतली असता काही राशन दुकानदारांनी नाव न सांगण्याच्या अटीवर सांगितले की तीन महिन्या ऐवजी केवळ एकाच महिन्याचे वाटप करण्याचे पुरवठा विभागाने सांगितले आहे. परंतु सर्वच पेपर तसेच टीव्ही चॅनलवर तीन महिन्याचे धान्य एकाच वेळी मिळत असल्याचे जाहीर झाल्याने, ग्राहक आमच्याशी वाद घालतील. त्यामुळे आम्ही धान्य वाटप न करण्याचा निर्णय घेतला आहे. जोपर्यंत तीन महिन्याचे धान्य वाटप करण्याचे आदेश येत नाहीत तोपर्यंत आम्ही धान्य वितरित करणार नाही. त्यामुळेच लाभार्थ्यांना धान्य मिळण्यास विलंब होत आहे. हे पाहता पुरवठा विभागाने आपली भूमिका स्पष्ट करावी अशी मागणी लाभार्थी राशन कार्ड धारक नागरिक करीत आहेत.

## नायगाव अंडरपास मध्ये घाण पाणी साचले...



प्रतिनिधी १० ऑगस्ट

**अकोला:** प्रभाग क्रमांक 1 म्हणजे नायगाव परिसरात विविध समस्या आहे. रेल्वे अंडरपास मधून लोकांना ये जा करावी लागते. परंतु सध्या अंडरपास मध्ये पाणी साचले आहे. घाण पाण्याची दुर्गंधी नागरिकांना सहन होत नाही. या भागातील नागरिकांनी या विषयासह परिसरातील समस्या सोडविण्याची मागणी महापालिका प्रशासनाकडे केली आहे. नायगाव मध्ये रेल्वे अंडरपास खालून प्रवेश करावा लागतो. सध्या पावसाचे पाणी अंडरपास मध्ये साचले आहे. त्यामुळे नागरिकांना ये जा करताना मोठ्या प्रमाणात त्रास होत आहे. मुले शाळेत जातात परंतु दुचाकी वाहने, ऑटोरिक्षाला नीट जाता येत नाही. घाण पाण्यातून वाटचाल केल्यामुळे आरोग्याचा प्रश्न उपस्थित झाला आहे. या भागातील नगरसेवक आणि महापालिका प्रशासनाने त्वरित विविध प्रकारच्या समस्या सोडवाव्या अशी मागणी आहे.

## 'हर हर महादेव'च्या जयघोषाने श्री राजराजेश्वर मंदिर दुमदुमले

प्रतिनिधी १० ऑगस्ट

**अकोला :** हिंदी भाषिकांच्या श्रावण महिन्यातील दुसऱ्या सोमवारी शहरातील सर्व शिवालयांमध्ये पहाटेपासूनच शिवभक्तांची दर्शनासाठी मोठी गर्दी पाहायला मिळाली. शहराचे आराध्य दैवत असलेल्या श्री राजराजेश्वर मंदिरातही यानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

संपूर्ण दिवस मंदिर परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला होता. पहाटे भगवान श्री राजराजेश्वर यांचा दुग्धाभिषेक व विधिवत पूजन करण्यात आले. त्यानंतर दिवसभर रुद्राष्टाध्यायीतील वेदमंत्रांचे अखंड पठण सुरू होते.



### शेकडो भाविकांनी घेतला महाप्रसादाचा लाभ

हिंदी भाषिकांच्या श्रावणातील दुसऱ्या सोमवारी श्री राजराजेश्वर मंदिरात दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांसाठी महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली होती. शेकडो भाविकांनी मोठ्या भक्तिभावाने महाप्रसादाचा लाभ घेतला. मंदिर समितीच्या या उपक्रमाचे भाविकांनी कौतुक केले.

मंदिरात दिवसभरात पाच वेळा महाआरती करण्यात आली. रात्री ९ वाजता पंचामृत, सुगंधी अत्तर व पवित्र जलाने भगवान श्री राजराजेश्वर यांना अभिषेकस्नान घालण्यात आले. त्यानंतर भगवानांचा आकर्षक व मनमोहक शृंगार करण्यात आला. शृंगार दर्शनासाठी शहरासह परिसरातील विविध भागांतून मोठ्या संख्येने भाविक मंदिरात दाखल झाले.

## आशा सेविकांचा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर एल्गार.....

प्रतिनिधी १० ऑगस्ट

**अकोला:** चार श्रम संहिता आणि त्यांचे नियम रद्द करा, संघटित व असंघटित क्षेत्रातील सर्व कामगारांसाठी संघटना स्थापन करण्याचा अधिकार, नोंदणी, मान्यता, ८ तासांचा कामाचा दिवस, कामाच्या ठिकाणी सुरक्षितता, सामाजिक सुरक्षा, संप करण्याचा अधिकार द्या, सहकारी संस्थांच्या माध्यमातून शेतीचे आणि सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम व सहकारी क्षेत्रांतर्गत कृषी-आधारित उद्योगांचे आधुनिकीकरण करा आदी मागण्यासाठी आज आशा वर्कर्स व गटप्रवर्तक संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे देण्यात आले. मागण्यांच्या समर्थनार्थ घोषणा देण्यात आल्या. अकोला - वाशिम सीटू, म. रा. जि. प. महिला परिचर अकोला व गटप्रवर्तक संघटना महाराष्ट्र राज्य, अकोला आदी संघटना सहभागी होत्या. आशा वर्कर्स आणि सहभागी संघटनांच्या पदाधिका-यांनी जिल्हाधिकारी यांना निवेदन सादर केले.

## राष्ट्रवादी कॉँग्रेस (शरदचंद्र पवार) च्या वतीने लाडकी बहीण योजनेतील E-KYC समस्येवर 12 ऑगस्ट रोजी धरणे

प्रतिनिधी १० ऑगस्ट

**अकोला :** महाराष्ट्र शासनाच्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील e-KYC च्या समस्येवरून राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) आक्रमक झाला आहे. e-KYC पूर्ण न झाल्यामुळे अनेक पात्र महिला योजनेच्या आर्थिक मदतीपासून वंचित राहत आहेत. शासनाने पुन्हा e-KYC पूर्ण करण्याची संधी उपलब्ध करून द्यावी, या मागणीसाठी बुधवार, १२ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला येथे धरणे आंदोलन करण्यात येणार आहे.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत पात्र महिलांना दरमहा ₹१,५०० आर्थिक मदत दिली जाते. योजनेच्या सुरुवातीला राज्यात सुमारे २ कोटी ४६ लाख महिला लाभार्थी होत्या. e-KYC व पात्रता तपासणीच्या प्रक्रियेनंतर लाभार्थी महिलांच्या संख्येत मोठी घट झाली असून, मे २०२६ मध्ये ही संख्या सुमारे १ कोटी ६६ लाखांपर्यंत पोहोचल्याचे वृत्त समोर आले होते. ई केवायसी पूर्ण करून महिलांच्या खात्यात पैसे जमा करावे अशी मागणी आहे.

धरणे आंदोलन अकोला जिल्हाध्यक्ष संग्रामभैया गावंडे, महानगराध्यक्ष रफीक सिद्दीकी, कार्याध्यक्ष देवानंद तळे, सय्यद युसूफ अली, प्रदेश उपाध्यक्ष श्याम अवस्थी, प्रदेश संघटक सचिव जावेद जकरिया, युवा आघाडी अध्यक्ष देवानंद राऊत तसेच महिला आघाडी अध्यक्ष सरलाताई वरेघट यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आले आहे. या आंदोलनाचे आयोजन राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) अकोला पश्चिम अध्यक्ष फिरोज खान हसन खान यांच्या वतीने करण्यात आले आहे. लाडकी बहीण योजनेच्या ज्या पात्र महिलांची अद्याप e-KYC झालेली नाही आणि e-KYC पूर्ण न झाल्यामुळे त्यांच्या खात्यात योजनेची आर्थिक मदत जमा होत नाही, अशा सर्व महिलांनी या आंदोलनात मोठ्या संख्येने व अनिवार्यपणे सहभागी व्हावे.

## कॉम्प्रेसर सिलेंडर फुटल्याने एक जण गंभीर जखमी

प्रतिनिधी १० ऑगस्ट

**परतवाडा:** येथील कैकाडीपुरा भागात रविवारी सायंकाळी भीषण दुर्घटना घडली. एसी, रेफ्रिजरेटर दुरुस्ती करीत असताना अचानक कॉम्प्रेसर सिलेंडर फुटल्याने प्रवीण डवले गंभीर जखमी झाले. त्यांचा पाय तुटून पडला, चेहरा भाजला. खोलीत रक्त पसरले होते. डवले यांना रूग्णालयात तातडीने दाखल करण्यात आले.

या घटनेमुळे परिसरात



घबराट पसरली. आजुबाजूचे लोक धावून आले. रविवारी सायंकाळी ५.२५ वाजताच्या सुमारास ही घटना घडल्याचे कळते. पोलिसांनी घटनास्थळी येऊन पाहणी केली. प्रवीण डवले यांची प्रकृती गंभीर असल्याचे रूग्णालयाच्या सूत्रांनी सांगितले.

## खाटू श्यामच्या भजनावर श्रोते थिरकले...!





प्रतिनिधी १० ऑगस्ट

**अकोला :** श्री रामदेव बाबा एवं श्री श्याम बाबा मंदिर, गीतानगर येथे श्री स्वार्थी श्याम परिवाराच्या वतीने श्रावण कृष्णपक्ष एकादशीनिमित्त श्रावण झुलनोत्सव व १८ वा श्री श्याम एकादशी संकीर्तन सोहळा भक्तिमय वातावरणात उत्साहात पार पडला.

यावेळी अकोला शहरातील प्रसिद्ध आंतरराष्ट्रीय भजन गायक गोपाल शर्मा हारे (अकोला, मुंबई) तसेच ऋषिका ठाकूर (ग्वाल्हेर) यांनी आपल्या सुमधुर भजनांनी उपस्थित श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. 'भक्तों ने झुल्ला घाला, बैठा है खाटू वाला', 'करके इशारा बुलाई गई रे राधा गोरी गोरी', 'जाने-अनजाने में ऐसा काम हो गया, मेरी जिंदगी का मालिक मेरा श्याम हो गया' यांसह विविध हिंदी, मराठी व राजस्थानी भजनांचे सादरीकरण करण्यात आले.

खाटू नरेश श्री श्याम बाबा, श्री रामदेव बाबा, उज्जैनचे महाकाल, श्री राजराजेश्वर महाराज, श्री राधा-कृष्ण व हनुमानजी यांच्या भक्तिगीतांनी संपूर्ण मंदिर परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. झुलनोत्सवाचे विशेष आकर्षण म्हणून अकोल्यात प्रथमच ऐतिहासिक महाभारत देखावा साकारण्यात आला होता. तसेच श्री श्याम बाबांचा झुल्यातील मनमोहक व दिव्य दरबार सजविण्यात आला. संपूर्ण मंदिर परिसर आकर्षक विद्युत रोषणाई आणि विविध रंगीबेरंगी फुलांनी सजविण्यात आल्याने भक्तांचे लक्ष वेधून घेतले.

या कार्यक्रमात श्री रामदेव बाबा एवं श्री श्याम बाबा सेवा समिती यांचा सहआयोजक म्हणून सहभाग होता. संकीर्तन सोहळ्यात हारे म्युझिकल ग्रुपने संगीत सेवा दिली तसेच दर्शना करीता आलेल्या सर्व भक्तांना रात्री उशीरा पर्यंत श्री स्वार्थी श्याम परिवाराच्या वतीने फलहाराचे वितरण करण्यात आले. झुलनोत्सव व संकीर्तन सोहळा यशस्वी करण्यासाठी गोपाल शर्मा हारे पदयात्री मित्र परिवार, श्री स्वार्थी श्याम परिवाराचे पदाधिकारी व समस्त कार्यकर्त्यांनी अथक परिश्रम घेतले.

## चोरीच्या उद्देशाने आलेल्या इसमाने केली शेतकऱ्याची चाकू भोसकून हत्या!

प्रतिनिधी १० ऑगस्ट

**मलकापूर :** मलकापूर ग्रामीण पोलीस स्टेशनच्या हद्दीतील काटी (ता. नांदुरा, जि. बुलढाणा) येथे चोरीच्या उद्देशाने फिरणाऱ्या अनोळखी इसमांना जाब विचारून एकास पकडण्याचा प्रयत्न करणाऱ्या ५२ वर्षीय शेतकऱ्याची पोटात चाकू भोसकून निर्घृण हत्या करण्यात आली. हीr धक्कादायक घटना ९ ऑगस्टच्या मध्यरात्री २ वाजेच्या सुमारास काटी येथील माउली देवीच्या वाट्याजवळ घडली. रायसिंग सिताराम सोळंके असे मृत शेतकऱ्याचे नाव आहे.

या प्रकरणी फिर्यादी निलेश शिवराम सोळंके (३०) रा. काटी यांच्या तोंडी रिपोर्टवरून तसेच उपजिल्हा रुग्णालय, मलकापूर यांच्या मेडिकल मेमोवरून मलकापूर ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

घटनाक्रमाची माहिती अशी की, मृत रायसिंग सोळंके यांच्या वाड्यात रात्री म्हैस वियाची असल्यामुळे ते वाड्यावर जागेच होते. दरम्यान, रात्री २ वाजेच्या सुमारास त्यांना गल्लीत तोंडाला रुमाल बांधलेले चार अनोळखी इसम संशयास्पद रित्या फिरताना दिसले. रायसिंग सोळंके यांनी त्यांना 'तुम्ही कोण आहात? कशासाठी आले?' असा जाब विचारत त्यांच्याकडे गेले असता, ते अनोळखी इसम काहीही न बोलता पळून जाऊ लागले.

रायसिंग यांनी त्यांचा पाठलाग करून त्यातील एका इसमाला पकडले. आपल्या सहकाऱ्याला सोडवण्यासाठी उर्वरित तिघे मागे फिरले व त्यातील एका अनोळखी इसमाने रायसिंग सोळंके यांच्या पोटात चाकूचा वार करून त्यांना गंभीर जखमी केले. या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या रायसिंग सोळंके यांचा मृत्यू झाला. चोरी करण्याच्या उद्देशाने आलेल्या या चारही अनोळखी इसमांविरुद्ध पोलीस ठाणे मलकापूर ग्रामीण येथे गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले.
■ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ■ संपर्क - ०७२४ - २४३५५७३, २४४४७७४ ■ email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135